रायगड, नवी मुंबई
• वर्ष १८ • अंक ११८
www.ramprahar.com
# राम प्रहर
• शनिवार, १५ नोव्हेंबर २०२५ • पाने ८ • किंमत ₹२



माथेरान : येथे नगर परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून भाजप आणि शिवसेना शिंदे पक्षाची युती निश्चित झाली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी माथेरानमधील भाजप युतीच्या उमेदवारांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. सोबत उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते. (छाया : संतोष खाडे)

# बिहारमध्ये एनडीएचा महाविजय

## महाआघाडीचा दारूण पराभव; प्रशांत किशोरही निष्प्रभ

**पाटणा : वृत्तसंस्था**
बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणित सत्तारूढ राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) आजवरचा सर्वात मोठा विजय मिळवला आहे. एनडीएने २४३ जागांपैकी तब्बल २०२ जागा जिंकून दोन तृतीयांश बहुमत मिळविले असून विरोधी पक्षाच्या महाआघाडीला मोठा पराभव सहन करावा लागला आहे. त्यांच्या पदरी सुमारे ३५ जागा आल्या आहेत, तर मोठा गाजावाजा करून निवडणूक रिंगणात उतरलेला रणनितीकार प्रशांत किशोर यांचा जनसुराज्य पक्ष खातेही खोलू शकला नाही.






बिहारमध्ये मतदान संपल्यानंतर जाहीर झालेल्या एक्झिट पोलमध्ये जवळजवळ सर्व सर्वेक्षण संस्थांनी एनडीएला मोठा विजय मिळण्याचा अंदाज वर्तवला होता. एक्झिट पोलचा अंदाज खरा ठरला असून राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) पुन्हा एकदा प्रचंड बहुमताने सरकार स्थापन करणार हे स्पष्ट झाले आहे.

बिहारमध्ये भाजप ९० जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्या खालोखाल जेडीयूने ८४ जागी यश मिळवले आहे. एनडीएतील एलजेपीला १९, आरएलएमला चार जागा मिळाल्या. विरोधकांच्या महाआघाडीला केवळ ३५ जागांवर समाधान मानावे लागले. यामध्ये आरजेडी २५, तर काँग्रेसला अवघ्या सहा जागीच विजय मिळवता आला. इतर पक्षांच्या वाट्याला काही जागा गेल्या आहेत.

## सुशासन आणि विकासाचा विजय -पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली** : बिहार विधानसभा निवडणूक निकालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिली प्रतिक्रिया देत बिहारच्या जनतेचे आणि एनडीएतील सहकारी पक्षांचे तसेच कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत. त्याचप्रमाणे दिल्लीतील मुख्यालयात कार्यकर्त्यांना संबोधित केले.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत पंतप्रधान मोदी म्हणाले, बिहारमध्ये सुशासन, विकास, जनकल्याण आणि सामाजिक न्यायाचा विजय झाला आहे. २०२५च्या विधानसभा निवडणुकीत एनडीएला ऐतिहासिक आणि अभूतपूर्व विजय मिळवून दिल्याबद्दल मी बिहारमधील माझ्या कुटुंबियांचे मनापासून आभार मानतो. हा प्रचंड जनादेश आपल्याला लोकांची सेवा करण्यास आणि बिहारसाठी नवीन संकल्पाने काम करण्यास शक्ती देईल.

*बिहारवासीयांनी दिलेले एक-एक मत हा भारताच्या सुरक्षेशी खेळणाऱ्या घुसखोरांच्या आणि त्यांच्या संरक्षकांच्या विरोधात मोदी सरकारच्या धोरणांवरील विश्वासाचे प्रतीक आहे. या निकालातून व्होटबँकेसाठी घुसखोरांना पाठीशी घालणाऱ्यांना बिहारच्या जनतेने योग्य उत्तर दिले आहे. बिहारने देशाचा मूड स्पष्टपणे दाखवला. मतदार यादीचे शुद्धीकरण आवश्यक आहे आणि त्यास विरोध करणाऱ्या राजकारणाला जागा नाही. म्हणूनच राहुल गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस आज बिहारमध्ये शेवटच्या पायरीवर पोहचली आहे. जनता आता केवळ परफॉर्मन्स आधारित राजकारणाला मत देते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री नितीश कुमार आणि एनडीएतील सर्व नेते व कार्यकर्त्यांचे अभिनंदन!*

**-अमित शाह,** केंद्रीय गृहमंत्री



# नागरिकांना विविध सुविधा देण्यासाठी प्राधान्य -माजी सभागृह नेते परेश ठाकूर

## तळोजात उद्यानाचे भूमिपूजन

**तळोजा : रामप्रहर वृत्त**
तळोजा परिसरात मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत आहे. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने महापालिकेच्या माध्यमातून विविध सुविधा येथील नागरिकांना उपलब्ध करून नागरिकांचे जीवनमान उंचावण्याचे काम होत आहे, असे प्रतिपादन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी तळोजा येथे उद्यानाच्या भूमिपूजनावेळी केले.

भाजपचे पनवेल उत्तर तालुका मंडळ उपाध्यक्ष निर्दोष केणी यांच्या प्रयत्नांमुळे तळोजा फेज १, सेक्टर १५ येथील प्लॉट नंबर ६वर नव्याने उद्यान विकसित करण्यात येणार आहे. महापालिकेच्या सहा कोटी ९३ लाख ९८ हजार ३६६ रुपयांच्या निधीतून साकारण्यात येणाऱ्या या उद्यानाच्या कामाचे भूमिपूजन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १३) झाले.

या कार्यक्रमास भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, उपाध्यक्ष निर्दोष केणी, प्रभाकर जोशी, तालुका उत्तर मंडळ सरचिटणीस विनोद घरत, आशा बोरसे, मन्सूर पटेल, सजित पटेल, सचिन म्हात्रे, जगदीश घरत, प्रभाग क्रमांक ३चे अध्यक्ष जगदीश घरत, रियाज शेख, संतोष घरत, युवा मोर्चाचे अध्यक्ष आशिष कडू यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## पनवेलमध्ये पेव्हर ब्लॉक कामाचा शुभारंभ



पनवेल महापालिका प्रभाग क्रमांक १९मधील कापड बाजारातील त्रिमूर्ती हॉटेलसमोरील गल्लीमध्ये पेव्हर ब्लॉक बसवण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १४) झाले. या वेळी माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप प्रभाग १९चे अध्यक्ष पवन सोनी, घनश्याम मानकामे, भगवती मेहता, अभिजित जाधव, तुषार कापरे, मंदार देसाई, चितुलला मेहता, भूषण चोणकर आदी उपस्थित होते.

## निवडक

### दिल्लीत प्रवाशांसाठी मार्गदर्शक सूचना जारी

**नवी दिल्ली** : राजधानी दिल्लीत नुकत्यात झालेल्या कार स्फोट प्रकरणानंतर पोलिसांनी प्रवाशांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय विमान उड्डाण सुरू होण्याच्या निर्धारित वेळेच्या किमान तीन तास विमानतळावर पोहचावे तसेच मेट्रो आणि रेल्वे प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी किमान २० मिनिटे आधीच निर्धारित ठिकाणी हजर रहावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

### ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल काळाच्या पडद्याआड

**मुंबई** : ज्येष्ठ बॉलीवूड अभिनेत्री कामिनी कौशल यांचे वयाच्या ९८व्या वर्षी निधन झाले आहे. नीचा नगर, जिद्दी आणि लाल सिंग चड्ढा या चित्रपटांसाठी ओळखल्या जाणाऱ्या कौशल यांनी आपल्या दीर्घ करिअरमध्ये अनेक अविस्मरणीय भूमिका साकारल्या. 'कबीर सिंह'मधील आजीची भूमिका त्यांची नव्या पिढीतही खास ओळख बनली होती. त्यांच्या जाण्याने मनोरंजन क्षेत्रात शोककळा पसरली आहे.



# अलिबागमध्ये महाविकास आघाडीत बिघाडी

## शिवसेना ठाकरे गट पालिकेत स्वतंत्र लढणार

**अलिबाग : प्रतिनिधी**
अलिबाग नगर परिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीची घोषणा शेकाप नेते जयंत पाटील यांनी काही दिवसांपूर्वी केली होती, पण आता आघाडीमध्ये बिघाडी झाल्याचे स्पष्ट झाले आहे. अलिबागमधील प्रमुख घटक पक्ष असलेला शेकाप एकही जागा सोडण्यास तयार नसल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष या आघाडीतून बाहेर पडल्यात जमा आहे. अलिबागमध्ये काही जागा स्वबळावर लढवण्याची तयारी 'उबाठा'ने चालवली आहे.

अलिबाग शहरातील २० जागांपैकी शेकापने दोन जागा महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसला दिल्या आहेत. काँग्रेसने या जागांवर अभय महामुणकर आणि समीर ठाकूर यांना उमेदवारी जाहीर करत ते प्रचारालाही लागले आहेत. शिवसेना 'उबाठा'ने शेकापकडे तीन जागांची मागणी केली होती, पण अद्यापपर्यंत एकही जागा देण्याची तयारी शेकापने दाखवलेली नाही. मागील निवडणुकीत शेकापचे सर्व १७ जागांवर उमेदवार निवडून आले होते. आता पालिकेत २० जागा असणार आहेत. त्यातील तीन जागा आम्हाला मिळाव्यात अशी 'उबाठा'ची अपेक्षा आहे, मात्र शेकापकडून शिवसेनेला कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही.

अलिबागच्या माजी नगरसेविका तनुजा पेरेकर, शहरप्रमुख संदीप पालकर आणि माजी शहरप्रमुख कमलेश खरवले यांनी निवडणूक लढवण्याची तयारी केली आहे. काही दिवसांपूर्वीच शिवसेना 'उबाठा'चे संपर्क प्रमुख प्रसाद भोईर यांनी पत्रकार परिषद घेत पक्षाची भूमिका स्पष्ट केली होती. जर शेकापने आमचा विचार केला नाही, तर स्वतंत्र निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी शेवटची तारीख १७ नोव्हेंबर आहे. अवघे चार दिवस हातात उरलेले असतानाही शेकापकडून कुठलाच प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे तीन ते चार जागा लढवण्याचा निर्णय शिवसेनेने घेतला असल्याची माहिती जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी दिली.



**अलिबागमध्ये महायुती व्हावी अशी आमची प्रामाणिक इच्छा होती. आम्ही तीन जागांची मागणी केली होती, मात्र मित्रपक्ष शेकापकडून कुठलाच प्रतिसाद न मिळाल्याने आम्ही स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला आहे.**

**-सुरेंद्र म्हात्रे, जिल्हाप्रमुख, शिवसेना 'उबाठा'**

# पनवेल-करंजाडेदरम्यान गाढी नदीवर होणार नवीन पूल

## महापालिकेचा पुढाकार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**
नागरिकांची होणारी गैरसोय व वाहतूक कोंडी लक्षात घेऊन पनवेल भूखंड क्रमांक ५०६ येथून करंजाडे मलनिस्सारण उदंचन केंद्राजवळ गाढी नदीवर नवीन पूल उभारण्याची योजना महापालिकेने आखली आहे. याबाबत पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी यांनी मागणी केली होती.

या प्रकल्पासाठी एकूण अंदाजित खर्च ४८ कोटी ४० लाख २२ हजार २९५.६३ रुपये इतका असून पुलाच्या आराखड्याचा प्रस्ताव प्रशासकीय महासभेत मंजूर झाला आहे. येत्या काही दिवसांतच या कामास प्रत्यक्षात सुरुवात होणार आहे, असे महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी सांगितले.

प्रस्तावानुसार चार लेनचा, २४० मीटर लांबीचा आणि २१.५ मीटर रूंदीचा हा पूल उभारण्यात येणार आहे. पुलाच्या पूर्वेकडे पनवेल महापालिकेचा ४० फूट रस्ता असून पश्चिमेकडे सिडकोच्या करंजाडे नोडकडे २० मीटर रुंद रस्ता आहे. या दोन्ही रस्त्यांना जोडल्याने परिसरातील वाहतूक सुलभ होईल व भविष्यातील वाढत्या रहदारीला दिशा मिळेल, अशी आशा अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी व्यक्त केली आहे.

या पूल बांधकामासाठी सिडको, जलसंपदा विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून अनुक्रमे ना-हरकत प्रमाणपत्रे मागवण्यात येणार आहेत तसेच पुलाच्या संकल्पनात्मक आराखड्याची तपासणी आणि मंजुरी आयायटी मुंबई किंवा व्हीजेआयटी मुंबई यांच्यामार्फत घेण्यात येणार असल्याचे शहर अभियंता संजय कटेकर यांनी सांगितले.



*वाहतूक कोंडी फुटणार!*

*पनवेलमधील उरण नाका येथून करंजाडेत जाणाऱ्या सध्याच्या पुलावर वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असून बऱ्याच वेळेला वाहतुकीची कोंडी होत असते. त्याचप्रमाणे येणाऱ्या काही दिवसांत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल-करंजाडे मार्गावर होणारा नवा पूल वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या पुलामुळे पनवेल शहर, करंजाडे व वडघर येथील वाढत्या वाहतुकीचा ताण कमी होईल.*

सस्नेह निमंत्रण



श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ
कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल, पनवेल शाखा
आयोजित
साहित्यिकांचा गौरव सोहळा आणि कविसंमेलन
सोहळ्याचे अध्यक्ष
मा.रामशेठ ठाकूर
लोकनेते,माजी खासदार
प्रमुख पाहुणे



मा.अशोक नायगावकर - सुप्रसिद्ध कवी
मा.अरुण म्हात्रे - सुप्रसिद्ध कवी
मा.ए.के.शेख - जेष्ठ गझलकार
शनिवार १५ नोव्हेंबर २०२५, सायंकाळी ४ वाजता
स्थळ - श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृह, मार्केटयार्ड पनवेल
आपण सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे ही विनंती
गणेश कोळी, अध्यक्ष, नवीन पनवेल शाखा
सुभाष कुडके, अध्यक्ष, पनवेल शाखा
कोकण मराठी साहित्य परिषद

# एसटीच्या उत्पन्नवाढीसाठी ‘पंचसूत्री’

## परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडून आराखडा जाहीर

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) उत्पन्नवाढ, कार्यक्षमता आणि प्रवासी सुविधांच्या उन्नतीसाठी सर्वसमावेशक ‘पंचसूत्री आराखडा’ तयार केला आहे. आगार पातळीपासून प्रादेशिक कार्यालयापर्यंत अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी अधिक स्पष्ट करत, सुधारणा, ‘वेग’ आणि ‘नियमितता’ या आधारे एसटी महामंडळाला पुढे नेण्याचा निर्धार केल्याचे प्रतिपादन परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.



मुंबई येथे एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्यासह सर्व खाते प्रमुख, प्रादेशिक व्यवस्थापक व विभाग नियंत्रक उपस्थित होते.

एसटी स्वतःला ‘चल संस्था’ म्हणून परिभाषित करते. दररोज लाखो प्रवाशांना सेवा देणाऱ्या या व्यवस्थेचे मूल्यमापन आणि नियोजन दैनंदिन पातळीवर व्हावे, यासाठी सकाळी १० वाजता आगारात, ११ ला विभागात आणि १२ वाजता प्रादेशिक स्तरावर आढावा बैठक अनिवार्य करण्यात आली आहे.प्रवासी तक्रारी, रद्द फेऱ्या, नादुरुस्त वाहने, गैरहजर कर्मचारी, या सर्वांची काटेकोर छाननी करून कार्यपद्धतीत तात्काळ सुधारणा करण्याचा आदेश बैठकीत दिला.संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत आगार, विभाग व प्रदेशस्तरावर दुसऱ्या दिवशीच्या वाहतूक आराखड्याचे नियोजन केले जाईल. यात्रांपासून बाजारपेठांपर्यंत आणि शालेय सहलींपासून आकस्मिक गर्दीपर्यंत सर्व परिस्थितीसाठी आगार सज्ज राहणार आहे.

**चालक-वाहकांसाठी स्पष्ट उद्दिष्टे, कार्यक्षमतेवर भर**

डिझेल हा एसटीच्या खर्चातील सर्वांत मोठा घटक. त्यामुळे घझढ्ङ (किलोमीटर प्रति १० लीटर) नुसार चालकांना दररोजचे लक्ष्य दिले जाईल. घझढ्ङ कमी असणाऱ्यांना समुपदेशन, प्रशिक्षण आणि गरजेनुसार प्रादेशिक स्तरावर उन्नत प्रशिक्षण देण्याचे नियोजन आखले गेले आहे.

तिकीट विक्री ही महसुलाची जीवन वाहिनी असल्याने वाहकांना आगाराच्या दैनंदिन (संचित प्रति किलोमीटर उत्पन्न) प्रमाणे उत्पन्नाचे स्पष्ट उद्दिष्ट देण्यात येणार आहे. उत्पन्न कमी असल्यास समुपदेशन, कर्तव्यात बदल किंवा तोंडी/लेखी समज सर्व पर्याय वापरले जातील. सातत्याने कमी उत्पन्न करणाऱ्या वाहकांवर विशेष लक्ष दिले जाईल.

एसटीचे वेळापत्रक हा त्याच्या वाहतूक यंत्रणेचा ‘आत्मा’ मानला जातो. लांब पल्ल्याच्या समांतर धावणाऱ्या बसेसवरील तक्रारींची दखल घेत आता सर्व वेळापत्रकांची शास्त्रशुद्ध पुनर्मूल्यांकन प्रक्रिया सुरू केली जात आहे. मध्यवर्ती कार्यालयाची मंजुरी असलेल्या फेऱ्याच राबवाव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत.

१ जानेवारीला बसस्थानकनिहाय नवे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात येणार असून त्याची व्यापक प्रसिद्धी केली जाईल. वक्तशीरपणा आणि नियमितता ही एसटीची नवी ओळख बनवण्याचा संकल्प यातून स्पष्ट दिसतो.

आरक्षणास उपलब्ध बसची संख्या वाढवणे, भारमान ८० टक्के पेक्षा कमी न ठेवणे, चांगले भारमान असणाऱ्या दिवशी जादा फेऱ्यांची उपलब्धता, आणि प्रत्येक फेरीची देखरेख पर्यवेक्षकांच्या ‘दत्तक’ तत्त्वावर बस फेऱ्या देणे अशा अनेक सुधारणा लांब-मध्यम पल्ल्याच्या व्यवस्थापनात होत आहेत. यासोबतच ऑनलाइन व मोबाईल अॅपद्वारे आरक्षणाला मोठे प्रोत्साहन देण्याचा मानस आहे.

**‘प्रवासी देवो भव’ सुविधांचा दर्जा उंचावणार**

स्वच्छ, टापटीप बसस्थानके, प्रसाधनगृहांची दररोज किमान तीन वेळा तपासणी, उशिरा सुटणाऱ्या किंवा रद्द बस फेऱ्यांची प्रवाशांना योग्य माहिती, पर्यायी व्यवस्था आणि अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक प्रसिद्धी अशा प्रवासी सुविधांना केंद्रस्थानी ठेवणारी उपाययोजना राबवली जाणार आहे.

# पनवेल मनपा क्षेत्रातील रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त मंगेश चितळे यांनी नुकत्याच झालेल्या बैठकित सर्व प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार खारघर मधील सेक्टर १३ मधील व्हाईट टेंपल ते सिग्नल रोडची पहाणी आज अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी केली. यावेळी दर्जेदार रस्ते करण्याबाबतच्या सूचना अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या.



आयुक्तांनी दिलेल्या र्निदेशानूसार शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर, पनवेल, कळंबोली, कामोठे या चारही प्रभागात नियुक्त केलेल्या कनिष्ठ अभियंत्याच्या देखरेखीखाली रस्ते दुरूस्तीची कामे जोमोने सुरू आहेत.

नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे युद्ध पातळीवर सुरू आहेत. अतिरिक्त आयुक्त रोज स्वतः विविध ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन कामाची पाहाणी करून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देत आहेत. सध्या महापालिका कार्यक्षेत्रात कळंबोली सेक्टर १३, रोडपाली सेक्टर १६ई, खारघर सेक्टर ३४, कोपरा ब्रीज, कामधेनू सेक्टर १३, गोल्फ कोर्स, नवीन पनवेल, येथे कामे सुरू आहेत.

# अज्ञात वाहनाची स्कुटीला धडक, महिलेचा मृत्यू

**पनवेल: वार्ताहर**

अज्ञात वाहनाने स्कुटीला दिलेल्या धडकेत महिलेचा मृत्यू झाल्याची घटना राहुल पार्क हॉटेल, पळस्पे येथे घडली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आला.

प्रियांशू त्रिपाठी हे शिखर ग्रीन सोसायटी, रसायनी पनवेल येथे राहत असून ते त्यांची आई रंजिता त्रिपाठी (वय ४२) हे रात्री साडेआठच्या सुमारास उलवे येथून अॅक्टिवा स्कुटीने रसायनी येथे जात असताना पळस्पे येथे आले असता पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या स्कुटीला धडक दिली. त्यामुळे त्यांचा गाडीवरचा ताबा सुटला आणि त्यांची आई रस्त्यावर पडली. तिच्या डोक्याला गंभीर दुखापत होउन तिचा मृत्यू झाला.

# वाशिवली येथे एसटी बसचे डिझेल चोरी करणारे अटकेत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वडगाव-वाशिवली हद्दीमध्ये मुक्कामी आलेली एस.टी. बस क्रमांक एमएच २० डीएल २२७९ ही एस.बी. कंपनीसमोर उभी केली असताना अज्ञात चोराने १२,८०० रूपये किंमतीचे १४० लिटर डिझेल चोरून नेले. एस.टी. चालक बाबासाहेब तांदले यांनी रसायनी पोलीस ठाण्यात डिझेल चोरीची तक्रार दिली असता रसायनी पोलीस अज्ञात चोरट्याचा छडा लावत साहिल संतोष परदेशी (वय २४, रा. खोपोली), विश्वजीत जयसिंग कदम (वय १९, रा. काजूवाडी, खोपोली), साहिल रमेश लाड (वय २३, रा. दहीवली-कर्जत) तिघा चोरांना ताब्यात घेतले असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सह फौजदार कोळेकर अधिक तपास करीत आहेत.

उरण नगर परिषद निवडणूक

# भाजप महायुतीच्या उर्वरित उमेदवारांचे अर्ज दाखल

**उरण : प्रतिनिधी**

उरण नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी शुक्रवार (दि.१४) रोजी उरण नगरपरिषद वार्ड ५ (ब) मधून भाजप रायगड जिल्हा अल्पसंख्याक अध्यक्ष जसिम इस्माईल गॅस यांच्यासह वार्ड ५ (अ) हिदा हमीद सरदार, वार्ड ७ (अ) मध्ये शाहीस्था इब्राहीम कादरी, वार्ड २ (अ) रिबेका रवींद्र मढवी या भाजप महायुतीच्या चार उमेदवारांनी तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. उद्धव कदम यांच्याकडे अर्ज सादर केला.



या वेळी माजी नगराध्यक्ष जयविन कोळी, माजी नगरसेवक कौशिक शाह, निलेश पाटील, भाजप रायगड जिल्हा अल्पसंख्यांक सरचिटणीस रय्यान तुंगेकर, सरजील कादरी, इम्तीयाज बेग, अजीज बेग,यासीम तुंगेकर, सोबन नेरेकर, जिल्हा अध्यक्ष राजस्थान प्रकोष्ठ पुखराज सुथार, तशीर तुंगेकर, रमजान शेख, असीम सोंडे, इब्राहिम भाईजी ,कसिन मुल्ला, यास्मिन गॅस, कुद्रूस शिलोत्री, रबुनिसा इस्माईल गॅस, याजिश बेग, हमीद सरदार, तहा गॅस आदी उपस्थित होते.

# कर्जत पालिका निवडणुकीसाठी पहिला उमेदवारी अर्ज दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी आज चौथ्या दिवशी पहिला उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. माजी नगरसेवक संकेत भासे यांनी सूचक विशाल बैलमारे यांच्या समवेत शिवसेना शिंदे गटाच्या वतीने प्रभाग क्रमांक दोन मध्ये आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांच्याकडे दाखल केला.



कर्जत नगरपरिषदेच्या निवडणुकीचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी अवघे तीन दिवस शिल्लक आहेत. काहींनी ऑनलाईन उमेदवारी अर्ज दाखल केले. काही जण करीत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव सेना आघाडी कडून कर्जत व माथेरान नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाहीर करण्यात आले. मात्र शिवसेना - भारतीय जनता पक्ष - आरपीआय युती कडून अद्याप उमेदवार जाहीर झाला नाही. नगरसेवक पदाच्या उमेदवारांचीसुद्धा यादी जाहीर झाली नाही. काल परवापर्यंत कुणा कुणाची युती किंवा आघाडी होईल याची स्पष्टता नव्हती.

# खोपोलीत मनसेला खिंडार; युवा नेते संजय तन्ना भाजपत

**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रस्ता आ स्थापना चे जिल्हाध्यक्ष संजय तन्ना यांनी काल उशिरा भारतीय जनता पक्षात प्रवेश केला त्यांचे स्वागत भाजप नेते व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले .संजय तन्ना यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्याने खोपोली बाजारपेठेतील व्यापारी वर्गाचा पक्षाला मोठा फायदा होईल असे बोलले जात आहे,



यापूर्वी त्यांच्यासोबतचे युवा कार्यकर्ते मितेश शहा यांनी यापूर्चा भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला होता. आमदार प्रशांतदादा ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाशजी कोळी सरचिटणीस प्रकाश बेनेदार दीपक बेहेरे खोपोली प्रभारी सुनील घरत यशवंत साबळे,यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पक्षातील नेत्यांचे भारतीय जनता पक्षात प्रवेश होत आहे. त्यामुळे आगामी नगरपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्ष मित्र पक्षांच्या सहकार्याने घवघवीत यश प्राप्त करेल असे कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते संजय तन्ना यांना भाजप प्रवेश देण्यात आला यावेळी जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी,सरचिटणीस प्रकाश बेनेदार, दीपक बेहरे, खोपोली प्रभारी सुनील घरत, ज्येष्ठ नेते वसंत भोईर, माजी नगरसेवक इंदरमल खंडेलवाल, सूर्यकांत देशमुख, ज्येष्ठ नेते मनीष खवळे, शहराध्यक्ष अजय इंगुलकर व इतर उपस्थित होते

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ई-वेस्ट जनजागृती व संकलन उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संगणक शास्त्र विभागातर्फे १४ नोव्हेंबर ई-वेस्ट जनजागृती व संकलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या उपक्रमात विद्यार्थी व शिक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदवत जुन्या व खराब झालेल्या मोबाईल फोन, चार्जर्स, बॅट्ऱ्या, केबल्स, कीबोर्ड आदी इलेक्ट्रॉनिक साहित्याचे संकलन केले. या उपक्रमाचा उद्देश पर्यावरणपूरक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे व ई-वेस्टचे योग्य व्यवस्थापन किती महत्त्वाचे आहे हे अधोरेखित करणे असा होता तसेच संकलित ई-वेस्ट अधिकृत पुनर्वापर केंद्राकडे पाठविण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला असून कॅम्पसवर शाश्वत पद्धतींबाबत जागरूकता वाढविण्यात या उपक्रमाने महत्त्वाची भूमिका बजावली.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या उपक्रमाच्या यशस्वीरीत्या आयोजन केल्याबद्दल संगणक शास्त्र विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा. या पर्यावरणीय कार्यक्रमाचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन विभाग प्रमुख संगणक शास्त्र यांनी केली तसेच विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

# प्रवाशाचा फोन शोधून केला परत

**पनवेल :** प्रवासादरम्यान रेल्वेतून पडलेला मोबाइल फोन रेल्वे पोलिसांनी शोधून प्रवाशाला परत केला. खारघर येथील १९ वर्षीय विद्यार्थी रेल्वेने प्रवास करत असताना खांदेश्वर ते मानसरोवर स्थानकादरम्यान त्याचा फोन रुळावर पडला. त्यानंतर त्याने याची तक्रार रेल्वे पोलिसांकडे केली. त्याची दखल घेत खांदेश्वर स्थानकावर उपस्थित रेल्वे पोलिसांनी त्याचा फोन शोधून त्याला परत केला.

# खोपोली शहरात भाजपतर्फे जल्लोष



**खोपोली : प्रतिनिधी**

बिहार विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी आणि मित्रपक्षांना मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल खोपोली शहरात भारतीय जनता पक्षातर्फे मोठा जल्लोष शनिवारीसाजरा करण्यात आला. यावेळी कार्यकत्यारनी फटाक्यांची आतषबाजी करत आणि एकमेकांना मिठाई वाटून विजयाचा आनंद व्यक्त केला.

भारतीय जनता पार्टीचे खोपोली शहर निवडणूक प्रमुख यशवंत सावळे यांच्या नेतृत्वाखाली हा विजयोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी भाजपच्या विजयाच्या जोरदार घोषणा देण्यात आल्या. या जल्लोषामध्ये जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, शहराध्यक्ष अजय इंदुलकर, भाजपात प्रवेश घेतलेले मनसेचे संजय तन्ना, मीतेश शहा, माजी शहराध्यक्ष रमेश रेटरेकर, माजी नगरसेवक सूर्यकांत देशमुख, इंदरमल खंडेलवाल, युवा नेते विक्रम साबळे, काशिनाथ पार्टे, हिम्मत मोरे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# धार्मिक स्थळांचा सिडकोने सकारात्मक विचार करावा

## आ. मंदा म्हात्रेंची सिडकोकडे मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांनी शुक्रवारी सिडकोचे एमडी विजय सिंघल यांची भेट घेत नवी मुंबईमध्ये महत्वपूर्ण होत असलेल्या प्रकल्पासंदर्भात आढावा घेतला. यासोबत विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. नवी मुंबईतील सर्व धार्मिक स्थळांचा सर्व्हे करून ५०० मीटरचा सामाजिक दर लावून धार्मिक स्थळे नियमित करावी व नवीन जे काही छोटे भूखंड आहेत ते धार्मिक स्थळांसाठी आरक्षित ठेवणे ही मागणी त्यांनी लावून धरली.

यासोबत फुलपाखरु उद्यान उभारणेकरिता सारसोळे पामबीच लगत असलेल्या १२ एकर भूखंड नवी मुंबई महानगरपालिककेस हस्तांतरण करणे आणिअन्य अनेक विविध प्रश्न संबंधित अधिकाऱ्यांसमोर उपस्थित केले या सर्व प्रश्नांवर व सिडको व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सकारात्मकता दाखवत सदर प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यात येणार असल्याचे सांगितले.

## दुखवटा

### सुरेखा हातनोलकर



**नागोठणे :** येथील श्री अष्टविनायक ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे संचालक रोहिदास हातनोलकर यांच्या मातोश्री कै. सुरेखा हरिश्चन्द्र हातनोलकर यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी गुरुवार दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे त्यांची दशक्रिया विधी शनिवार दि. २२ नोव्हेंबर रोजी शृंगार तळा येथे व उत्तरकार्य मंगळवार दि. २५ नोव्हेंबर रोजी त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती हातनोलकर परिवारा कडून देण्यात आली.

### मधुकर घाणेकर



**माणगाव :** बनोटी गावाचे सुपुत्र ज्येष्ठ समाजसेवक मधुकर नावजी घाणेकर (वय ८५) यांचे १२ नोव्हेंबर रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे.

### हरिश्चंद्र गोरे



**पाली :** बेणसे गावचे समाजसेवक हरिश्चंद्र पांडुरंग गोरे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ८२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा सुन नातू, नात सुन नात विवाहित २ मुली तसेच भाऊ, भावजय, पुतणे, नातवंड, पतवंडे, सोयरे असा मोठा परिवार आहे. त्यांचा दहावा दिनांक १८/११/२०२५रोजी सुधागड तालुक्यातील उध्दर येथे होणार आहे. तर तेरावा दिनांक २१/११/२०२५ रोजी बेणसे येथील राहत्या घरी होणार असल्याची माहिती गोरे कुटुंबीयांनी दिली.

### शेखर लाळे



**उरण:** उरण शहरातील देऊळवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा ब्राह्मण सभेचे सभासद, देऊळवाडीतील विठ्ठल मंदिराचे पुजारी शेखर गणपत लाळे यांचे बुधवार दिनांक १२ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा असा त्यांचा कुटुंब परिवार आहे.शेखर लाळे यांच्यावर पनवेलमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

# अखेर स्विगी प्रशासन नमले

## तिन्ही मुलांना पुन्हा घेतले कामावर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्विगी प्रशासनाने पनवेल शहरातील त्यांच्या कार्यालयातून तडकाफडकी तीन स्थानिक मुलांना कामावरून कमी करण्याचा अन्यायकारक निर्णय घेतल्याने कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली होती. या प्रकरणात भाजपने थेट मैदानात उतरत स्विगी प्रशासनाला जाब विचारला आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आक्रमक हस्तक्षेपामुळे अखेर स्विगी प्रशासनाला माघार घ्यावी लागली आहे.

१५ दिवस चाललेल्या संघर्षानंतर शुक्रवारी (दि. १५) तिन्ही मुलांना पुन्हा कामावर घेण्यात आले आहे. ही संपूर्ण लढाई आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील आणि पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझारराव यांच्या नेतृत्वाखाली भाजपने जोरदारपणे छेडली होती. स्थानिक मुलांवर झालेल्या अन्यायाविरोधात सर्व कर्मचारीदेखील एकजूट झाले होते.

संघर्षाच्या काळात आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्विगी प्रशासनाविरुद्ध आक्रमक भूमिका घेत स्पष्ट इशारा दिला की, तिन्ही मुलांना पुन्हा रुजू करा, नाही तर स्विगीविरोधात मोठे आंदोलन उभारू. पनवेलच्या मुलांवर अन्याय झाल्यास भाजप शांत बसणार नाही. या ठाम भूमिकेमुळे स्विगी प्रशासनावर दडपण वाढले आणि अखेर त्यांना पाऊल मागे घ्यावे लागले.

पनवेलमधील भाजप मध्यवर्ती कार्यालयात स्विगी प्रशासनाचे वेस्टर्न रिजन लीगल हेड अमोल डांगे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहराध्यक्ष सुमित झुंजारराव यांच्यात शुक्रवारी महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत अमोल डांगे यांनी तिन्ही मुलांना पुन्हा कामावर घेण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर संघर्षाला विजयाचे रूप मिळाले. बैठकीला शहर उपाध्यक्ष प्रीतम उर्फ पिंट्या म्हात्रे, सरचिटणीस रुपेश नागवेकर, शहर कोषाध्यक्ष प्रवीण मोरबाळे, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष हितेश बहिरा, भाजपचे अनेक पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




# पाच लाखांच्या फसवणूकप्रकरणी पनवेल पोलिसांत गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

स्टीलसाठी दिलेले पाच लाख १४ हजार ४०० रुपये परत न करता फसवणूक केल्या प्रकरणी अनोळखी इसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात ११ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पनवेल येथील संतोष अस्वले यांचा बिल्डिंग मटेरियल सप्लायरचा व्यवसाय आहे. त्यांना ९ टन टाटा स्टीलची ऑर्डर मिळाली. डीलर कडे टाटा स्टील उपलब्ध नसल्याने त्यांनी गुगलवर व्यक्ती आणि एजन्सी सर्च केली असता मोबाईल नंबर मिळाला. संपर्क केला असता यावेळी समोरील इसमाने पाच लाख १४ हजार ४०० रुपयांचे बिल पाठवले. आणि त्यानंतर संतोष यांनी आरटीजीएस द्वारे पेमेंट केले. दुसऱ्या दिवशी समोरील इसमाने लहान ऑर्डर साठी डिलिव्हरी होऊ शकत नाही, १५ ते १८ टन ऑर्डर केल्यास डिलिव्हरी केली जाईल अन्यथा ऑर्डर ब्लॉक करून पैसे परत केले जातील असे सांगितले.

त्यावेळेस संतोष यांनी पैसे परत करण्यास सांगितले. त्यावेळी २४ तासात पैसे येतील असे सांगितले. बँकेत जाऊन चौकशी केली असता समोरील इसमाचे नाव विनोद कुमार व मेरठ येथील बँक असल्याचे समजले. त्यांनी आरटीजीएस केलेले पैसे परत आले नाहीत. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

# वाहतूक शाखेच्या तत्परतेमुळे मौल्यवान वस्तू मिळाल्या परत



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर वाहतूक शाखेच्या तत्परतेमुळे भाईंदर येथिल रिंकू प्रजापति यांची हरवलेली बॅग व मौल्यवान वस्तू परत मिळाल्या बद्दल त्यांनी वाहतूक पोलिसांचे आभार मानले.

रिंकू प्रजापति यांनी सांगितले की त्या करंजाडे येथे त्यांच्या नातेवाईकाकडे आले असता आमची बॅग व त्यातील मौल्यवान वस्तू रिक्षामध्ये गहाळ झाल्या आहेत आम्ही रेल्वे स्टेशन परिसरात रिक्षा चालकाचा शोध घेतला व विचारपूस केली परंतु रिक्षाचालक आम्हास मिळून आला नाही. म्हणुन वाहतूक पोलिसांना विनंती केली त्यांनी मोबाईल द्वारे ऑनलाइन पेमेंट केलेले पाहून सदरचे पैसे कोणाला पाठवले आहेत त्या रिक्षाचालकाचा सोशल मीडियाचा वापर व रेल्वे स्टेशन परिसरात विचारपूस करून शोध घेतला व रिक्षा चालकाकडून हरवलेली बॅग व मौल्यवान वस्तू आमच्या ताब्यात देण्यात आल्या. वरिष्ठ पोलीस निरीक्षक (पनवेल शहर वाहतूक) औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शेरखाने, पो हवा युवराज येळे, पो हवा आमीर मुलाणी आदी सदर ठिकाणी कार्यरत होते.

# दुचाकीला टेम्पोची जोरदार धडक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत वानिवली गावच्या हद्दीत रॉयल कार्बन ब्लॅक कंपनीसमोरील रोडवर फिर्यादी जीवन शंकर पाटील (वय ४९, रा. खानावळे ता. पनवेल) हे त्यांचे ताब्यातील मोटारसायकलने वाशिवली ते तळवली असे खारपाडा-सावरोली रोडने जात होते. वानिवली गावच्या हद्दीतील रॉयल कार्बन ब्लॅक कंपनीतून येणाऱ्या टेम्पोने मोटारसायकलला ठोकर मारुन टेम्पोचालक पळून गेला.

याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात टेम्पो चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अधिकारी एस.आर. म्हात्रे अधिक तपास करीत आहेत.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त

# तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सवी वर्षपूर्ती सोहळा सर्वत्र साजरा केला जात आहे. या अमृत महोत्सवी वर्षपूर्ती सोहळयानिमित्त 'वक्तृत्व स्पर्धा: शव्दांचा सोहळा विचारांचा उत्सवॐ' अशी ही तालुका स्तरीय स्पर्धा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे रामशेठ ठाकूर विद्यालय, खारघर-ओवेपेठ येथे शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर रोजी रंगली. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या वक्तृत्व गुणांना चालना मिळावी व समाजातील एक उत्तम वक्ते निर्माण व्हावेत या उदात्त हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये पनवेल तालुक्यातील सर्व माध्यमाच्या शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविला होता. स्पर्धेचा विषय 'मा.श्री. रामशेठ ठाकूर यांचे जीवनकार्य' हा होता.



ही स्पर्धा इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थी गटात घेण्यात आली. या स्पर्धेच्या उदघाटन कार्यक्रमास समारंभ अध्यक्ष म्हणून अॅड. राहूल घरत, सदस्य, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था पनवेल हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे प्रभाकर जोशी भा.ज.पा. पनवेल तालुका संघटक, सचिन वासकर भा.ज.प. पनवेल तालुका उत्तर मंडळ चिटणीस जयदास तेलवणे सचिव पनवेल तालुका उत्तर मंडळ, अॅड. इर्शाद शेख भा.ज.प. सरचिटणीस अल्पसंख्यांक मोर्चा उत्तर रायगड, डॉ. महेश्वरी झिरपे, प्राचार्या, रामशेठ ठाकूर महाविद्यालय, खारघर तसेच श्रीमती निशा नायर, प्राचार्या,रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर हे मान्यवर उपस्थित होते.स्पर्धा परीक्षण प्रा.डॉ.महादेव चव्हाण, रामशेठ ठाकूर महाविद्यालय, खारघर व मानसी कोष्टी, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर यांनी केले. या सर्व मान्यवरांचे स्वागत विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर यांनी केले.

# गावठी हातभट्टी दारूप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

गावठी भट्टीच्या दारूप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात बारक्या बबन कातकरी आणि राजू वास्कर यांच्या विर-ोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मानघर जंगलामध्ये गावठी हातभट्टीची दारू तयार होत असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस माणघर जंगलात गेले असता धूर दिसून आला. त्या ठिकाणी पाहणी केली असता दोन ईसम गावठी हातभट्टीची दारू काढत असताना दिसून आले.

यातील एक जण पळून गेला आणि दुसऱ्याला ताब्यात घेतले. त्यांनी त्याचे नाव बारक्या बबन कातकरी असे सांगितले. पळून गेलेल्या इसमाचे नाव राजू वास्कर (रा. कुंडे वहाळ) असे सांगितले. याबाबत पुढील तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत .

# 'दिबां'च्या जीवनकार्य रेखाटनाचा माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी घेतला आढावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रकल्पग्रस्तांचे झुंझार लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांच्या कार्याची माहिती शालेय विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात त्यांच्या प्रतिमेसह जीवन प्रवासातील महत्त्वपूर्ण घटना व कार्याची माहिती भिंतींवर आकर्षकपणे रेखाटण्यात आली आहे.

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुक्रवारी या उपक्रमाची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी त्यांच्यासोबत लोकनेते दि.बा.पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, पवन सोनी, प्रशांत शेट्टे, महापालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर उपस्थित होते.

# बिहार निवडणुकीत भाजपप्रणित एनडीएने मिळवलेल्या विजयाचा उरणमध्ये जल्लोष

**उरण : रामप्रहर वृत्त**

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणीत एनडीएने मिळवलेल्या भव्य विजयाचा उत्साह देशभरात पहायला मिळत असून त्याच विजयाचा आनंद उरण शहरातही होता. उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या जनसंपर्क कार्यालयाबाहेर शुक्रवारी भाजप कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात जल्लोष केला.

बिहारमधील विजयाची बातमी मिळताच उरणमधील कार्यकर्ते आनंदाने एकत्र जमले.फटाक्यांच्या आतषबाजीनंतर कार्यकर्त्यांनी एकमेकांना मिठाई वाटली. परिसर पंतप्रधान नरेंद्र मोदी जिंदाबाद, भाजप जिंदाबाद च्या घोषणांनी दणाणून गेला.विशेष म्हणजे, बँडच्या तालावर अनेक कार्यकर्ते थिरकत आनंद व्यक्त करत असल्याचेदृश्य विशेष आकर्षण होते.



या विजयी जल्लोषात आमदार महेश बालदी स्वत उपस्थित राहिले. त्यांनी कार्यकर्त्यांचे अभिनंदन करून बिहारमधील विजयाला राष्ट्राच्या विकासवर जनतेने दाखवलेल्या विश्वासाची पावती असल्याचे सांगितले. विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



पनवेल : डेरवली गावचे युवा नेते अतुल घरत यांना राज्याचे कॅबिनेट मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी पुष्पगुच्छ देत खास शुभेच्छा दिल्या. पनवेल तालुक्यातील युवक नेतृत्व मजबूत करण्याच्या दृष्टीने हा सन्मान महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या प्रसंगी आमदार महेश बालदी, पनवेल तालुका पश्चिम मंडळाचे अध्यक्ष रुपेश धुमाळ, कोळखे डेरवली ग्रामपंचायतीचे सरपंच रोहन म्हात्रे, नांदगाव ग्रामपंचायतीचे सरपंच मनोहर भोईर, भाजपचे विभागीय सरचिटणीस रवींद्र शेळके, विनायक पाटील, पळस्पे पंचायत समितीचे दक्षिण युवा अध्यक्ष मयूर म्हात्रे यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

# ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांची वंदे मातरम् समितीवर नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बंकीमचंद्र चटटोपध्याय यांनी सन १८५७ साली लिहिलेल्या वंदे मातरम् या गीतास स्वातंत्र्यलढयात तसेच स्वातंत्रोत्तर कालखंडातही अनन्ययाधारण महत्व प्राप्त आहे. आनंदमठ या कादंबरीतील हे गीत भारतमातेच्या स्तृतीचे प्रतीक असून स्वातंत्र्य लढयातील असंख्य क्रांतीकारकांना प्रेरणादायी ठरलेले आहे. या गीतास ७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्ष पूर्ण झाली. त्यानिमित्ताने शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये वंदे मातरम् गीताच्या १५०व्या वर्धापन दिनाचा यशस्वी आयोजनासाठी अपर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. यात शिक्षण संस्था प्रतिनिधी म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.





उलवे नोड : सेक्टर २४, २५, २५एच्या रस्त्यांच्या दुरवस्थेबद्दल पाहणी करण्यासाठी सिडकोचे अधिकारी वाळंबे तसेच गोसावी यांना बोलावून प्रत्यक्ष झालेली दुरवस्था दाखवण्यात आली. त्यांनी येणाऱ्या पंधरा दिवसाच्या आत चांगले रस्ते बनवून देऊ, असे आश्वासन दिले आहे तसेच सेक्टर २५ए मधील टेंडर पुढच्या आठवड्यात निघेल आणि आम्ही लगेच रस्त्यांच्या कामाला सुरुवात करू असे आश्वासित केले आहे. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, भाजप गव्हाण जिल्हा परिषद अध्यक्ष निलेश खारकर यांनी सेक्टर २४, २५, २५ए मधील सर्व नागरिकांतर्फे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांना धन्यवाद दिले, कारण त्यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरून नागरिकांच्या समस्या सोडवा अशी तंबी दिली आहे.



पनवेल : भारतीय जनता पक्षाचे डेरवली गावातील युवा नेते अतुल घरत यांचा वाढदिवस नुकताच साजरा झाला. यानिमीत्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी महाराष्ट्र वाहतुक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर, अनेश ढवळे, रवींद्र शेळके, रूपेश शेंडे, संदीप पाटील, विठ्ठल गाताडे, मयुर म्हात्रे, जयेश गाताडे, महेंद्र गोजे उपस्थित होते.

# महापालिका मुख्यालयात पं. जवाहरलाल नेहरू जयंतीनिमित्ताने अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे , मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त मंगला माळवे, उपायुक्त स्वरूप खारगे, लेखाधिकारी संग्राम व्होरकटे व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## संपादकीय

# विकास व सुशासनाचा विजय


बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीने ऐतिहासिक दणदणीत विजय मिळवला असून भारतीय जनता पक्ष हा एनडीएमधील सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला आहे. विरोधकांच्या महागठबंधनसाठी हा निकाल प्रचंड धक्कादायक ठरला असून काँग्रेस पक्ष तर पुरता कोसळलेला दिसला. महाराष्ट्रासारखीच विरोधकांची स्थिती आता बिहारमध्येही दिसते आहे.

**संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या बिहारच्या विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीने अर्थात एनडीएने ऐतिहासिक विजय मिळवला असून महाराष्ट्रासारखीच विरोधकांची स्थिती आता बिहारमध्येही दिसते आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीप्रमाणेच बिहारमध्येही विरोधकांच्या 'महागठबंधन'ला ५० जागांचा आकडाही गाठता आलेला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बिहारचे दोन दशकांपासून नेतृत्व करणारे नितीशकुमार यांनी एनडीएला बिहारच्या इतिहासातील आजवरचा सर्वात मोठा विजय मिळवून दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाचा या विजयात मोठा वाटा आहे. संध्याकाळच्या कलांनुसार, ९० जागा जिंकणाऱ्या भाजपने महागठबंधनला प्रचंड मोठा धक्का दिला आहे. नितीशकुमार यांच्या जदयुनेही ८५ जागा जिंकून एनडीएमध्ये दुसरा क्रमांक मिळवला. निवडणूक आयोगावर वाट्टेल तसे आरोप करणारे काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी, राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांचे अवघे मनसुबे या निकालाने धुळीस मिळवले आहेत. बिहारमधील महिलांसाठी नितीशकुमार यांच्या सरकारने निवडणुकांपूर्वी मुख्यमंत्री महिला रोजगार योजना जाहीर केली. या योजनेचा पहिला हप्ता म्हणून प्रत्येकी १० हजार रुपये सुमारे दीड कोटी महिलांच्या खात्यात जमा करण्यात आले. महिला मतदारांना केलेल्या या मदतीचे पुरेपूर प्रतिबिंब निकालात उमटलेले दिसते आहे. निवडणुकीत एनडीए व महागठबंधन यांच्यामध्ये चुरशीची लढत झाली. एनडीएमध्ये भाजप, जनता दल युनायटेड, व लोकजनशक्ती पार्टी (रामविलास पासवान) हे प्रमुख पक्ष होते तर महागठबंधनमध्ये राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस व डावे पक्ष होते. निवडणुकीत एनडीएने स्पष्ट बहुमत मिळवून विजयी मुसंडी मारली आहे तर महागठबंधनसाठी हा निकाल प्रचंड धक्कादायक आहे. निवडणुकीत काँग्रेस पक्ष पुरता कोसळला असून काँग्रेसची कामगिरी अत्यंत सुमार म्हणावी लागेल. काँग्रेसचे एसआयआरविरोधाचे आणि मतचोरीचे मुद्दे बिहारी जनतेला अजिबात आकर्षित करू शकले नाहीत. काँग्रेस आपले खोटेनाटे नरेटिव्ह पुढे रेटत असताना राजदचे तेजस्वी यादव यांनी रोजगार व अन्य प्रश्नांवर भर देण्याचा प्रयत्न केला खरा, पण दोन्ही पक्षांमध्ये कोणताही समान मुद्दा जनतेला दिसला नसावा. एक-दोन सभा वगळता राहुल गांधी आणि तेजस्वी यादव एका व्यासपीठावर आलेही नाहीत. विधानसभा निवडणुकांमध्ये राहुल गांधी नेहमीच शेवटच्या टप्प्यात निष्क्रियतेचे दर्शन घडवतात. त्याचा फटका काँग्रेसप्रमाणेच राजदलाही बसला आहे. याआधीच्या २०२०च्या बिहार विधानसभा निवडणुकीत चिराग पासवान यांची लोकजनशक्ती पार्टी स्वतंत्रपणे लढली होती. तेव्हा नितीशकुमार यांच्या पक्षाचे मोठे नुकसान झाले होते. यावेळी लोकजनशक्ती पार्टी एनडीएमध्ये दाखल झाल्याने लोकजनशक्ती पार्टीचेही २१ आमदार निवडून आले आहेत. नितीशकुमार यांचे वय व प्रकृतीचा मुद्दा लावून धरण्याची पातळीही विरोधकांनी गाठली. परंतु बहुदा त्यामुळे त्यांना सर्वसामान्य मतदारांची सहानुभूतीच मिळाली असावी. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारमधील विजयाचे वर्णन 'सुशासनाचा व विकासाचा विजय' असे केले असून आता पुढील लक्ष्य पश्चिम बंगाल असेल याचीही घोषणा त्यांनी केली आहे.**

# समस्त भारतीयांची प्रेरणा भगवान बिरसा मुंडा

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अत्यल्प जीवनकालात स्वयंप्रेरणेने मानवी जीवनाचे अत्युच्च शिखर गाठणारे भगवान बिरसा मुंडा यांची आज जयंती. आद्य जनजाती क्रांतीनायकाची भूमिका बजावत स्वकर्तृत्वाने भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात अतुलनीय योगदान देणारे बिरसा मुंडा केवळ जनजातींसाठीच नव्हेत तर समस्त भारतीयांसाठी प्रेरणादायी आहेत.

भगवान बिरसा मुंडा यांचा १५ नोव्हेंबर हा जन्मदिन भारत सरकारने जनजाती गौरव दिन म्हणून घोषित केला आहे. रांची विमानतळ आणि इतर शासकीय इमारतींना त्यांचे नाव दिलेले आहे. झारखंडमध्ये त्यांना भगवान तथा जनजाती आद्य क्रांतिनायक म्हणून संबोधले जाते. पिता सुगना पुर्ति (मुंडा) व माता कर्मी पुर्ति यांचे सुपुत्र बिरसा पुर्ति (मुंडा) यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंड मधील खुटी जिल्ह्यातील उलिहातू गावी झाला. हालाखीच्या परिस्थितीतही त्यांचे बालपण जंगलातील वृक्षांच्या सहवासात मातीत मनसोक्त खेळणं, बासरी वाजवणं, विविध वनस्पती गोळा करणं, धनुर्विद्या, नेमबाजीचा सराव करणं यात रममाण होतं. शिक्षणातील त्यांची रुची आणि गती पाहून शाळेतील जयपाल नाग यांनी पुढील शिक्षणासाठी बिरसाला 'जर्मन मिशन स्कूल' येथे पाठवण्याचा सल्ला दिला. त्यासाठी धर्मांतरण सक्तीचे होते. शिक्षणासाठी बिरसा मुंडा हे बिरसा डेविड झाले. येथील चार वर्षांच्या शिक्षण कालखंडात त्यांनी आपल्या लोकांवरील इंग्रजांचा अनन्वित अत्याचार आणि सक्तीचे धर्मांतरण जवळून अनुभवले. याचा प्रचंड तिरस्कार वाटून मिशनरी धर्म, मिशनरी नाव व पर्यायाने मिशनरी शिक्षणाचा त्याग केला आणि ते स्वधर्मात आले.



तत्कालीन प्रसिद्ध वैष्णव आनंद पांडा यांच्या सहवासात त्यांनी हिंदू धर्माची शिकवण आत्मसात केली. गीता, रामायण, महाभारत सारख्या हिंदू धर्मग्रंथांचे वाचन केले. अनेकविध वन्य औषधींची माहिती व त्याचा योग्य प्रयोग यावर अभ्यास केला. स्वधर्म, स्वसंस्कृतीविषयी आत्मीयता वाटून स्वसमाजाच्या सर्वतोपरी विकासाच्या दृष्टीने त्यांनी बिरसाईत पंथाची स्थापना केली. या अंतर्गत त्यांनी गावोगाव फिरून परिस्थितीने पिचलेल्या समस्त जनजातीला मानवी मूल्ये, स्वधर्माभिमान, स्वसंस्कृती जोपासना, मातृभूमी प्रेम, भूतदया, आरोग्य, शिक्षण इत्यादींचे महत्त्व पटवण्यासाठी प्रबोधन केले. कॉलरा ,प्लेग यांसारख्या महामारीच्या काळात निस्वार्थ जनसेवा केली.

दरम्यान ब्रिटिश राजवटीचे झारखंड जंगल भागातील अतिक्रमण, अत्याचार तसेच सक्तीच्या धर्मांतरणासाठी मिशनऱ्यांचा प्रादुर्भाव व्यापक प्रमाणावर जोर धरू लागला होता. १८८२मध्ये भारतीय जंगल अधिनियम कायदा करून त्याचा गैरवापर सुरू केला. जनजातींवर कराची सक्ती करून त्यांना त्यासाठी कर्जबाजारी केले. या कायद्याने त्यांचे जंगल हिरावून घेतले जात होते, शेती करण्यावर निर्बंध आणले जात होते. आधीच आर्थिक दृष्ट्या हालाखीचे जीवन जगणाऱ्या जनजातींना इंग्रजांच्या असह्य अत्याचार आणि शोषणामुळे नरक यातनांना सामोरे जावे लागत होते.

वास्तविक जनजाती बाहेरच्या जगापासून अलिप्त राहून आपल्या जंगलात प्राप्त परिस्थितीत समाधानाने जीवन व्यतीत करणारा जनसमुदाय, पण स्वार्थापोटी इंग्रज राजवटीने त्यांचे हे साधेसुधे जीवनमान सुद्धा उधळून लावण्याचा सपाटा सुरू केला होता. बिरसा यांनी याविरुद्ध जनजागृती सुरू केली. बिरसांच्या विद्रोही हालचालींमुळे २४ ऑगस्ट १८९५ रोजी इंग्रजांनी त्यांना व त्यांच्या काही साथीदारांना दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा केली. सुटकेनंतर बिरसा रांची येथील जगन्नाथ मंदिरात वास्तव्यास आले. येथील दोन वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी जगन्नाथाची भक्ती व जनजातींची सेवा अविरत सुरू केली. सोबतच गुप्तपणे सशस्त्र उठावाची रचना केली. मुंडा, कुल, संथाल, उराव इत्यादी अनेक जनजातींना संघटित केले. आपल्या या धुरंधर क्रांतीनायकाच्या नेतृत्वात सहा हजार जनजाती पुरुष, महिला,अबालवृद्ध तीर-कमान, भाले, कुऱ्हाडी इत्यादी हत्यारांसह मातृभूच्या स्वतंत्रतेसाठी इंग्रजांविरुद्ध सशस्त्र उठावास सज्ज झाले. २५ डिसेंबर १८९९ रोजी गनिमी युद्धास अतिशय जोशपूर्ण सुरुवात झाली. हेच उलगुलान होय! जनजातींच्या या मातृभूमीच्या प्रेमाने भारलेल्या सशस्त्र माऱ्यापुढे इंग्रजांच्या बंदुका व तोफा निष्प्रभ होऊन त्यांची पिछेहाट होऊ लागली. इंग्रजांनी बिरसा यांस पकडून देणा-यास ५०० रु. इनाम जाहीर केले. इनामाच्या लोभाला बळी पडलेल्या स्वजनांच्या फितुरीने बिरसा ३ मार्च १९०० रोजी इंग्रजांच्या हाती पकडले गेले. वयाच्या अवघ्या २५व्या वर्षी ६ जून १९०० रोजी कारावासातच भगवान बिरसांचा रहस्यमय मृत्यू झाला.

**-कविता शेटे, जनजाती कल्याण आश्रम, पुणेद्वारा विश्व संवाद केंद्र पुणे**

# थोर क्रांतिकारक वीर बिरसा मुंडा

बिरसा मुंडा यांचा आज स्मृतिदिन. बिरसा मुंडा हे एक भारतीय आदिवासी क्रांतिकारक होते. ते आदिवासी समाजाचे वीर नायक होते. १९व्या शतकातील शेवटच्या वर्षात मुंडा जमातीच्या आदिवासींकडून इंग्रज सरकारविरुद्ध जनआंदोलने केली, त्याचे नेतृत्व बिरसा मुंडा यांनी केले होते. त्यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील उलीहातू येथे झाला. त्यांचे बालपण इतर मुंडा आदिवासी मुलांप्रमाणेच जंगलात व ग्रामीण भागात व्यतीत झाले. त्यांचे वडील जनावरे चारण्याचे काम करायचे. तेही वडिलांसोबत रानात जावून धनुर्विद्या व नेमबाजीचा सराव करायचे. बालपणीच त्यांचा नेम फार चांगला होता. पुढे मुंडा प्रसिद्ध वैष्णव भक्त आनंदानंद पांडे यांच्या संपर्कात आले. वाचन व लेखन येत असल्याने त्यांनी महाभारत, रामायण व गीता असे अनेक हिंदू धार्मिक ग्रंथांचे वाचन केले. त्यांच्यासोबत राहून इंग्रजांच्या काळ्या धोरणाचा त्यांना फार तिरस्कार यायचा. बिरसा मुंडा यांनी १९००मध्ये इंग्रजांविरूद्ध विद्रोह करण्याची घोषणा केली व म्हटले आम्ही ब्रिटिश शासनाच्या तत्वांविरुद्ध विद्रोहाची घोषणा करतो. आम्ही कधीच ब्रिटिशांच्या कायद्यांना मानणार नाही. आम्ही इंग्रजांचे अधिपत्य स्वीकारत नाही.

जो इंग्रज आमच्याविरुद्ध उभा राहील त्यास आम्ही यमसदनी पाठवू. यामुळे संतप्त ब्रिटिश सरकारने आपली सेना बिरसा मुंडा यास पकडण्यासाठी पाठविली. बिरसा मुंडा यांनी विविध जमातीच्या गटांना एकत्र आणले. त्यांना इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रेरित केले. इंग्रज सरकारने बिरसा मुंडा यास अटक केली. त्यांच्यासोबत ४६० आदिवासी युवकांनाही अटक करण्यात आली. अशा या थोर क्रांतिकारकाचे ९ जून १९०० रोजी निधन झाले.

बिरसा यांच्या आंदोलनाची ब्रिटिशांना गंभीरपणे दखल घ्यावी लागली. ब्रिटिशांनी छोटा नागपूर टेनन्सी ॲक्ट मंजूर करून आदिवासींचे जमिनीवरील हक्क मान्य केले (१९०२). आदिवासी-हक्क, स्त्री-स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा यांच्यासाठी लढा देणारा पहिला आदिवासी नेता म्हणून बिरसा यांची ओळख आहे. रांची येथील डिस्टिलरी पुलाजवळ बिरसांची समाधी असून तेथे त्यांचा पुतळा उभारला आहे. तसेच रांची येथील केंद्रीय कारागृहास आणि आंतरराष्ट्रीय विमानतळास बिरसा मुंडा यांचे नाव देण्यात आले आहे. बिरसा यांनी शिक्षणाचा उपयोग आदिवासींचं जीवनमान उंचावण्यासाठी केला. आदिवासींचं जीवन अभ्यासलं. जंगलात अनेक दिवस काढले. आदिवासींमध्ये जनजागृती केली. भारतीय संस्कृती, आयुर्वेद समजून घेतलं. औषधी विज्ञानात पारंगत झाले. रुग्णांची सेवा करू लागले. घर स्वच्छ ठेवा. खोटं बोलू नका. एकजूट राहा. निर्णय पंचायतकडून करा, असा संदेश त्यांनी आदिवासींना दिला.

देशभरात विशेषता बिहार, ओडिसा, झारखंड, छत्तीसगड, प. बंगाल या भागात बिरसा मुंडा यांना क्रांतीसूर्य मानलं जातं. १५ नोव्हेंबरला त्यांची जयंती आदिवासी बांधव साजरी करतात. (साभार : इंटरनेट)




# फेसबुक ॲप, वेबसाइटवर फोटो लाइक बटण नसणार

फेसबुकने मोठा निर्णय घेतला आहे. हा निर्णय म्हणजे फेसबुकचे लाईक आणि कमेंट बटण काढून टाकलं जाणार आहे. खरंतर, १० फेब्रुवारी २०२६पासून हा नियम लागू होणार आहे, पण हा नियम फक्त फेसबुक ॲप किंवा वेबसाइटपुरताच असणार आहे. म्हणजे याचा अर्थ असा की ज्या ब्लॉग, शॉपिंग पोर्टल आणि वेबपेजमध्ये फेसबुक पोस्ट एम्बेड, कमेंट आणि लाईक करण्याचं जे बटण असेल ते नसणार आहे. तुम्ही न्यूज वेबसाइट किंवा ब्लॉगवर बसून पोस्टला लाईक किंवा कमेंट करू शकणार नाही.




आता, मेटाने हे बटण बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. १० फेब्रुवारी २०२६नंतर फेसबुकचे लाईक किंवा कमेंट बटण कोणत्याही बाह्य वेबसाइटवर दिसणार नाही. याचा अर्थ असा नाही की लाईक बटण फेसबुकवरून गायब होईल, तर ते आता फेसबुक ॲप आणि वेबसाइटपुरते मर्यादित असेल. जर तुम्ही एखाद्या बातम्यांच्या वेबसाइटवर लेख वाचत असाल आणि फेसबुकचा छोटासा निळा अंगठ्याचं चिन्ह दिसलं तर ते येत्या काही दिवसांत गायब होणार आहे. याचा अर्थ युजर्सना आता कोणत्याही कंटेंटवर त्यांचा अभिप्राय, मतं देण्यासाठी थेट फेसबुकवरच जावं लागणार.

लोक पूर्वी बातम्यांच्या वेबसाइट्सना भेट देत असत आणि तिथल्या पोस्ट लाईक करत असत, परंतु आता बहुतेक संवाद थेट फेसबुक ॲपमध्ये होतातम शिवाय इंटरनेटवरील गोपनीयता नियम कठोर झाल्यामुळे, या जुन्या बटणांच्या डेटा ट्रॅकिंग यंत्रणा आता तितक्या प्रभावी राहिल्या नाहीत. मेटा आता जुनी साधने टप्प्याटप्प्याने काढून टाकू इच्छिते आणि एक नवीन फ्रेंडली सिस्टम लाँच करणार असल्याचं बोललं जातं.

या बदलामुळे वापरकर्त्यांना कोणताही त्रास होणार नाही. फेसबुक ॲप आणि वेबसाइटवरील लाईक आणि कमेंट फीचर्स तसेच राहतील. फरक एवढाच आहे की तुम्ही न्यूज साइट किंवा ब्लॉगवरील लाईक बटणावर क्लिक करून लाईक वर क्लिक करू शकणार नाही. तथापि, वेबसाइटच्या मालकांनीही काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही. मेटाने स्पष्टपणे सांगितले आहे की, डेव्हलपर्सना कोणतेही तात्काळ तांत्रिक बदल करण्याची आवश्यकता नाही. वेबसाइट्स नेहमीप्रमाणे काम करत राहतील. फक्त जुना कोड काढून टाकल्याने त्या थोड्या जलद होतील.

# भूदान चळवळीचे प्रणेते विनोबा भावे

भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज पुण्यतिथी. रायगड जिल्ह्याच्या पेण तालुक्यातील गागोदे या गावी विनोबा तथा विनायक नरहरी भावे यांचा जन्म झाला. त्यांच्या आजोबांचे नाव शंभुराव भावे. शंभुरावांचे जन्मगाव वाई. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. आजोबा आणि मातुश्रींपासून धर्मपरायनतेचे संस्कार विनोबांना मिळाले.

विनोबा भावे यांचे वडील नरहरी शंभुराव भावे व आई रूक्मिणीबाई हे नोकरीच्या निमित्ताने बडोदे येथे गेले. विनोबांचे माध्यमिक आणि उच्च शिक्षण बडोदे येथेच झाले. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईस जाण्यास निघाले, परंतु वाटेतच सुरतेस उतरून आई-वडिलांना न कळविताच वाराणसी येथे रवाना झाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते. एक हिमालय व दुसरे बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयातील एका समारंभात महात्मा गांधीचे भाषण झाले. त्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला.

हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती यांच्या दोन्ही प्रेरणा महात्मा गांधीच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्त्वात त्यांना आढळल्या. महात्मा गांधींशी पत्रव्यवहार केला. महात्मा गांधींची कोचरब आश्रमात ७ जून १९१६ रोजा भेट घेतली आणि तेथेच त्या सत्याग्रहश्रमात नैष्ठिक ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करून जीवनसाधना सुरू केली. ऑक्टोबर १९१६ रोजी महात्मा गांधींची एक वर्षांची रजा घेऊन ते वाई येथे प्राज्ञपाठशाळेत वेदान्ताच्या अध्ययनाकरिता उपस्थित झाले. ब्रह्मविद्येची साधना त्यांचा जीवनोद्देश होता.



## निमित्त

१९३२ सालच्या सविनय कायदेभंगाच्या सामुदायिक आंदोलनात विनोबांनी भाग घेतला. त्यांनी धुळे कारागृहामध्ये शिक्षा भोगली. सुप्रसिद्ध गीताप्रवचने या कारागृहात त्यांनी दिली. शंभरापेक्षा अधिक सत्याग्रही कैदी आणि इतर गुन्ह्यांस्तव शिक्षा झालेले कैदी या प्रवचनांच्या रविवारच्या सभेत उपस्थित असत. त्यांमध्ये शेठ जमनालाल वजाज, गुलजारीलाल नंदा, अण्णासाहेब दास्ताने, साने गुरूजी इ. मंडळी उपस्थित असत.

वैयक्तिक सत्याग्रहानंतर ७ मार्च १९५१पर्यंत पवनार येथील परंधाम आश्रमातच विनोबांनी शारीरिक आणि मानसिक तपश्चर्येत जीवन व्यतीत केले. १९३६पासून महात्मा गांधी साबरमतीचा आश्रम सोडून सेवाग्रामला म्हणजे पवनारजवळच येऊन राहिले. त्यामुळे गांधी आणि विनोबा यांचा चिरकाल संवाद चालू राहिला. गांधीच्या देहान्तानंतर सर्वसेवासंघ व सर्वोदय समाज या संस्थांची स्थापना झाली. मार्च १९४८मध्ये विनोबा दिल्ली येथे जवाहरलाल नेहरू यांच्या विनंतीवरून गेले. भारत-पाक फाळणी झाल्यानंतर परागंदा झालेले लक्षावधी शरणार्थी (सर्व बाजूंनी जीवन उद्ध्वस्त झालेले) दिल्ली, पंजाब, राजस्थान यांमध्ये आले. त्यांना धीर देण्याकरता विनोबांना पंडितजींनी बोलावून घेतले. या दौऱ्यात सर्वधर्मसमभावाचा आदेश देऊन प्रेम आणि सद्भावना निर्माण करण्याचा प्रयत्न विनोबांनी केला.

१५ नोव्हेंबर १९८२ रोजी सकाळी ९.४० वाजता पवनार येथे परंधाम आश्रमात सतत सात दिवस प्रायोपवेशन करून भूदान नेते आचार्य विनोबा भावे यांचे वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. विनोबांनी प्रायोपवेशनाच्या द्वारे देहत्याग केला. भारत सरकारने विनोबांना भारतरत्न (मरणोत्तर, १९८३) हा किताब देऊन त्यांचा गौरव केला. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात बाजरीची लापशी खाण्याचे जबरदस्त फायदे

हिवाळा ऋतूचे आगमन झाले आहे. प्रत्येक ऋतूनुसार खाण्याच्या सवयी बदलू लागतात. तर थंडीच्या दिवसात शरीर उबदार ठेवण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी अनेकजण त्यांच्या आहारात अधिक पौष्टिक आणि उबदार पदार्थांचा समावेश करतात. हिवाळ्यात अनेकजण बाजरीसह अनेक पारंपारिक धान्यांचादेखील त्यांच्या आहारात समावेश करतात. तर बाजरी हा हिवाळ्यातील सुपरफूड मानला जातो. ते खाल्ल्याने दिवसभर ऊर्जा मिळते आणि उबदारपणा देखील जाणवतो. बाजरीमध्ये मुबलक प्रमाणात फायबर, लोह, मॅग्नेशियम, प्रथिने आणि ॲंटीऑक्सिडंट्स असतात.



आहारतज्ज्ञ मोहिनी डोंगरे यांच्या मते बाजरीची लापशी ही थंडीच्या दिवसात सेवन करणे अत्यंत फायदेशीर आहे. दररोज सकाळी नाश्त्यात लापशी खाल्ल्याने तुम्हाला दिवसभर ऊर्जा मिळेल आणि आळस येणार नाही. गोड लापशी बनवण्यासाठी तुम्ही त्यात गूळाचा वापर करू शकता. चवदार व मसालेदार लापशीसाठी तुम्ही विविध भाज्या त्यात मिक्स करू शकता, ज्यामुळे त्याचे पौष्टिक मूल्य आणखी वाढते. हिरवे मुग यात मिक्स केल्याने व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता दूर होण्यास मदत होते. बाजरीत भरपूर फायबर असते, ज्यामुळे वजन कमी करण्याचा किंवा नियंत्रित करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी ते एक उत्तम पर्याय आहे. दररोज एक वाटी बाजरीची लापशी खाल्ल्याने बद्धकोष्ठता आणि गॅस देखील दूर होतो. ओमेगा-३ मुळे तुमच्या शरीरातील रक्तदाब नियंत्रित करण्यास देखील मदत करते.

आहारतज्ज्ञ यांच्या मते उकडलेली बाजरी खाल्ल्याने अनेक फायदे आपल्या शरीराला होत असतात. याच्या सेवनाने शरीरातील उर्जेची पातळी वाढवते आणि आळस दूर होते. बाजरी पोटासाठी हलकी मानली जाते, ज्यामुळे अल्सर किंवा ॲसिडिटीचा त्रास असलेल्यांसाठी ते फायदेशीर ठरते. बाजरीमधील मॅग्नेशियमचे प्रमाण उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदयरोगाचा धोका कमी करण्यास मदत करते.

बाजरी हा एक सुपरफूड आहे जो तुम्ही तुमच्या आहारात अनेक प्रकारे समाविष्ट करू शकता. लोकांना सामान्यतः बाजरीची भाकरी खायला आवडते, जी स्वादिष्ट आणि फायदेशीर दोन्ही मानली जाते. हिवाळ्यात बाजरीची भाकरी खाल्ल्याने शरीर आतून उबदार राहते. त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित होण्यास मदत होते आणि पचन सुधारते. तज्ञांच्या मते तुम्ही दिवसातून दोन भाकरी खाऊ शकता.

# अलिबागमध्ये नगराध्यक्षपदासाठी तनुजा पेरेकर महायुतीच्या उमेदवार

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी महायुतीतर्फे तनुजा पेरेकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. अलिबाग नगर परिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्ष (भाजप), शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांनी एकत्र येत महायुतीची घोषणा केली आहे. या युतीकडून नगराध्यक्षपदासाठी सौ. तनुजा पेरेकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. दक्षिण भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांनी पेरेकर यांचे नाव जाहीर केले.

घोषणा झाल्यानंतर, सर्व उपस्थित मान्यवरांच्या वतीने भाजपचे नगर परिषद प्रचार प्रभारी सतीश धारप यांच्या हस्ते तनुजा पेरेकर यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले आणि उमेदवारीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या वेळी खासदार धैर्यशील पाटील यांच्यासह भाजपचे जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते, शोभा जोशी, आणि इतर सहयोगी पक्षांचे महत्त्वाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमताने या निर्णयाचे स्वागत केले.

महायुतीच्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे अलिबाग नगरपालिकेच्या निवडणुकीला आता नवी दिशा मिळाली असून ही युती विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



## विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवणार

## पोलादपुरात घरपट्टीवाढीविरोधात मोर्चा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्याची ग्रामपंचायत म्हणून नगरपंचायतीमध्ये रूपांतर झालेल्या पोलादपूर नगरपंचायतीने गेल्या वर्षापासून केलेली घरपट्टीवाढ पोल–ादपूरकरांच्या संतापाचे कारण ठरले आणि पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत शुक्रवारी हिंदूहृद–यसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे सभागृहापासून बाजारपेठ व महाबळेश्वर मार्गावरून थेट नगरपंचायतीवर धडकलेल्या घरपट्टीवाढीविरोधातील जनआक्रोश मोर्चाची संपूर्ण कोकणात चर्चा होऊ लागली.

मोर्चातील सहभागी नागरिकांची वाढती संख्या पाहून नगरसेवकांन–ीदेखील मोर्चात सहभागी होऊन घरपट्टीवाढीला विरोध करण्याची भूमिका घेतली. यानंतर पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विनय शिपाई यांनीही घरपट्टीवाढीचा वाढता विरोध लक्षात घेऊन जिल्हाधिकारी तसेच प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करण्यासंदर्भात लेखी अनुकूलता दर्शविली आहे.

---

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोहपे, तहसील पनवेल, जिल्हा– रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे मोहपे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे. आर. प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|---|
| १७/४/ब | २ | ०–२९–६० | ०–०३–०० | ०–३२–६० | ६.८१ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १४/११/२०२५**

**सही/–**
**अ‍ॅड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**

**कार्यालयीन पत्ता**
**गाळा क्रं. १५४, पनवेल महानगरपालिका कॉम्पलेक्स तहसिदार ऑफिस जवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**
**संपर्क :– ८८८८२७१७५९**

---

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे उमरोली, तहसील पनवेल, जिल्हा– रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे–:

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे उमरोली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे. आर. प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | कब्जेदार यांचे मालकीचे क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|---|
| २३/१ | ०–५२–०० | ०–०४–०० | ०–५६–०० | ०–४०–०० पैकी विक्री क्षेत्र ०–२४–०० | २.८१ |

वरील मिळकती बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १४/११/२०२५**

**सही/–**
**अ‍ॅड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**
**( खरेदीदारचे वकिल)**

**कार्यालयीन पत्ता**
**शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका कॉम्पलेक्स तहसिदार ऑफिस जवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**
**संपर्क :– ८८८८२७१७५९**

---

## जाहिर नोटीस

सर्व संबंधीतास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकतीबाबत खरेदीचा व्यवहार तीचे मालक १) श्री अरूण शांताराम पाटील, २) श्री विजय शांताराम पाटील. ३) श्री मेघश्याम शांताराम पाटील व ४) श्रीमती सुहासिनी नंदकुमार नागवेकर, रा. अरिवली, ता. पनवेल, जि. रायगड यांचेबरोबर ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे– अरिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील जमीन मिळकत**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|
| १३५/१ | ०.१५.९० | २.२५ |
| १३७ | ०.५९.९० | १०.०६ |

वरील मिळकतीशी अथवा तिच्या कोणत्याही भागाबाबात कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, कुळ, वहीवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध, निर्दोश व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून व कोणत्याही इसमाचे हक्क असल्यास ते सोडून दिले आहेत असे समजले जाईल आणि आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मुदतीनंतर येणा–या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी

**नवी मुंबई**
**दिनांक १४/११/२०२५**

**सही/–**
**अ‍ॅड. नवीन वि. धागडी**
**पत्र व्यवहाराचा पत्ता– फ्लॅट नंबर डी–४०१, ग्रिनस्केप रॉयल को. ऑप. ही.सी., प्लॉट नं. २५, सेक्टर ७, कामोठे, नवी मुंबई–४१०२०९–**
**मो.क. ९००४०८७८७३**

---

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

दुरध्वनी क्र. : ०२२–२७४५८०४०/४१/४२. फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२–२७४५५७५१ उपायुक्त कार्यालय : ०२२–२७४५२३३९
Email Id : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जाहिर सुचना

### महिला व बालकल्याण विभाग

महिला व बालकल्याण विभागामार्फत पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये वास्तव्य असणाऱ्या महिला/मुली व १८ वर्षाखालील असणाऱ्या बालकांसाठी खाली नमुद केलेल्या योजना राबविण्यात येत आहेत त्या योजनांची माहिती पुढील प्रमाणे.

१. पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागातर्फे प्रभाग निहाय मुलींना / महिलांना चार चाकी वाहन (शिकाऊ परवान्यासह) चालविणेचे व्यवसायिक प्रशिक्षण देणे.
२. पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागातर्फे कॅन्सर या दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या महिलांना व मुलांना/मुलींना अर्थसहाय्य देणे. (रक्कम रुपये ५०,०००/– फक्त एकदाच)
३. पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण अंतर्गत राज्य व राष्ट्रीय क्रिडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या खेळासाठी (वैयक्तिक व सांधिक) मुलींना अर्थिक मदत करणे.
४. पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत वैद्यकिय शिक्षण (एम.बी.बी.एस / बी.ए.एम.एस./बी.एच.एम.एस./बी.डी.एस.) घेणाऱ्या मुलींना प्रोत्साहानात्मक शिष्यवृत्ती देणे.
५. महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत अनाथ/निराश्रीत मुलींना दत्तक घेतलेल्या पालकांसाठी प्रोत्साहनात्मक अनुदान देणे.
६. महिला व बालकल्याण विभागातर्फे १ किवा २ मुलींवर (कुटुंबनियोजन) शस्त्रक्रिया करणाऱ्या जोडप्यांना प्रोत्साहनपर अनुदान देणे. (फक्त एकदाच)
७. महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत मुली व महिलांना स्पर्धा परीक्षा (UPSC/MPSC/Staff Selection / Banking) या सारख्या विविध स्पर्धा परीक्षाकरीता अर्थसहाय्य देणे करीता (०१/०४/२०२५ नंतर Prelim उत्तीर्ण झालेल्या व Main Exam ची तयारी करत असलेल्या विद्यार्थिनींसाठी)

तरी सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांनी घ्यावा. ह्या योजनांच्या अर्टी शर्ती पनवेल महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत तसेच सदर योजनेचे फॉर्म महिला व बालकल्याण विभागात उपलब्ध आहेत.

**जा.क्र. पमपा/जनसंपर्क./३१२५/**
**प्र.क्र.५९६/६१७/२०२५**
**दिनांक :– १४/११/२०२५**

**सही/–**
**महेशकुमार मेघमाळे**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

---

## कागदपत्रे हरविलेबाबत

मी, श्री. किरण श्रीराम धेंडे , रा. फ्लॅट नं ४०१ सी विनायक को.ऑप. हौ. सोसायटी आदई गाव पनवेल, जि. रायगड.

माझेकडून आदई गाव येथे प्रवास करित असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी नवीन खांदेश्वर शहर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून, त्याचा मिसिंग रजि. नं. VdkjzhyQht दि. १७/१०/२०२५ रोजी नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांच्याकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. शेअर सर्टीफिकेट, नं. ०७७ (आधीचे ओनर अरुण गोपाल गोसावी व सुरेखा अरुण गोसावी)

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ८६९३०२६७२४ वर संपर्क साधावा.

दिनांक : १४/११/२०२५

**सही/–**
(किरण श्रीराम धेंडे)

---

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

### पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक- २०२५

### जाहिर सूचना

पनवेल महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरिता सोडत दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पाडण्यात आली आहे.

परंतु मा. राज्य निवडणूक आयोग यांनी पत्र क्रमांक- रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.५७/का-५, दि.१४ नोव्हेंबर २०२५ अन्वये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांच्या ६ जागांसाठी व सर्वसाधरण महिलांसाठी जागा नेमून देणेकरीता सुधारित सोडत काढणेबाबत कळविले आहे त्यानुसार खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहिर करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. | ना.मा.प्र महिलांच्या आरक्षणाची सोडत काढणे व यथास्थिती नियमानुसार सर्वसाधारण महिला जागा नेमुन देण्याची कार्यवाही करणे | सोमवार, दिनांक- १७ नोव्हेंबर २०२५<br>सकाळी- ११:०० वा<br>स्थळ- आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृह |
| २. | प्रारुप आरक्षण, हरकती व सूचना मागविण्यासाठी विहीत नमुन्यात प्रसिध्द करणे . | वार- बुधवार<br>दिनांक – १९ नोव्हेंबर २०२५ |
| ३. | प्रारुप आरक्षण हरकती व सूचना मागविण्याचा अंतिम दिनांक | वार- मंगळवार<br>दिनांक- २५ नोव्हेंबर २०२५<br>(दुपारी ३:०० वा पर्यंत) |
| ४ | हरकती व सुचना दाखल करण्याचे ठिकाण | पनवेल महानगरपालिका मुख्यालय ( नागरी सुविधा केंद्र ) अथवा संबंधित प्रभाग कार्यालय येथे सादर करावयात. |

टीप :- दाखल झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन आरक्षणाची अंतिम अधिसूचना प्रसिध्द काण्यात येईल.

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांक :- १४/११/२०२५**

**स्वाक्षरी/-**
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ६२/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अतिरिक्त पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र .. सरसाई गावातील भूखंड क्रमांक एम-१ व एम-२ साठी पायाभूत सुविधा पुरवणे. | ₹ ६०,४४,६४,५०४.०० |
| २ | शहापूर धेरंड औद्योगिक क्षेत्र ... पोयनाड येथील जलशुध्दीकरण केंद्र ते शहापूर धेरंड औद्योगिक क्षेत्रापर्यंत पाणी पुरवठ्यासाठी १५०० मि.मी. व्यासाची मृदु पोलादी जलवाहिनी पुरवणे, टाकणे व जोडणे तसेच औद्योगिक क्षेत्रात ५०० मि.मी. व्यासाची मृदु पोलादी जलवितरण वाहिन्या पुरवणे. | ₹ ५१,४९,३१,६१६.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २६/११/२०२५ ते दिनांक २२/१२/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०८/१२/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १२/१२/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

---

## महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय दिनांक ०८ एप्रिल, २०२५ अन्वये निश्चित केलेले वाळू/रेती निर्गती धोरणानुसार यांत्रिक पध्दतीने ड्रेजरव्दारे वाळू/रेती उत्खननासाठी राखीव उपगटांकरीता ई–निविदेसह ई–लिलाव (सन २०२५–२६)

**सर्वसाधारण माहिती**

सदरची ई–निविदेसह ई–लिलाव प्रक्रिया वाळू/रेती निर्गती धोरण, दिनांक ०८ एप्रिल, २०२५. महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांचेकडील सी. आर. झेड विषयक अनुमती व पर्यावरण विभागाकडील पर्यावरण विषयक अनुमती आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडील अनुमती/सर्वेक्षण अहवालामधील अटी/शर्तीस अधीन राहून करण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातील पाताळगंगा नदी, अंबा नदी/धरमतर खाडी, कुंडलिका नदी/रेवदंडा खाडी, राजपूरी खाडी (मांदाड नदी), सावित्री नदी/बाणकोट (केंबुर्ली ते राजेवाडी) या खाडीपात्रामधील सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्याच्या प्रयोजनार्थ यांत्रिक पध्दतीने ड्रेजरव्दारे रेती उत्खननाकरीता राखीव असलेल्या वाळू/रेत्ती गट व उपगटांच्या निर्गतीसाठी ई–निविदासह ई–लिलाय पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यामधील पाताळगंगा नदी, अंबा नदी/धरमतरखाडी, कुंडलिका नदी/रेवदंडा खाडी, राजपूरी खाडी (मांदाड नदी), सावित्री नदी/बाणकोट (केंबुर्ली ते राजेवाडी) या खाडीपात्रातील एकूण ६७ उपगटातील वाळू/रेती निर्गतीसाठी सन २०२५–२६ करिता ई–निविदासह ई–लिलाव प्रक्रियेची सविस्तर माहिती https://mahatenders.gov.in तसेच www.raigad.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच इच्छुक व्यक्तींना/संस्थांना या प्रक्रियेमध्ये भाग घेणेसाठी विनंती करण्यात येत आहे. या प्रक्रियेची सविस्तर माहिती घेणेकामी www.raigad.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) प्रसिध्द करण्यात आली आहे.

| अ.क्र | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | रायगड जिल्ह्यातील **पाताळगंगा नदी, अंबा नदी/धरमतर खाडी. कुंडलिका नदी/ रेवदंडा खाडी, राजपुरी, सावित्री नदी–बाणकोट खाडी (केंबुर्ली ते राजेवाडी)** या खाडीपात्रातील सागरी किनारपटटी क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी यांत्रिकी पध्दतीने ड्रेजरव्दारे वाळू/रेतीचे उत्खनन करणेबाबत. |
| २ | इसारा रक्कम | ई–निविदेसोबत उपगटाच्या हातची किंमत्ती २५% इतकी रक्कम ऑनलाईन/डी.डी. पध्दतीने भरावी लागेल. (प्रत्येक उपगटासाठी स्वतंत्र ई–निविदा सादर करणे आवश्यक राहील.) |
| ३ | ऑनलाईन रजिस्ट्रेशन, ई–निवीदा खरेदी करणे व ई–निवीदा भरणे | दिनांक १४/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून प्रक्रियेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीं/संस्था/कंपनीचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन, ई–निविदा खरेदी व ई–निविदा भरणे सुरु होईल. |
| ४ | ई–निवीदा ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा / भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक २१/११/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑनलाईन रजिस्ट्रेशन, ई निवीदा खरेदी करणे बंद होईल. |
| ५ | ई–निविदा उघडण्याची तारीख व वेळ | दिनांक २४/११/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता ई–निविदा डाऊनलोड करुन उघडण्यात येईल. |
| ६ | निविदा उघडण्याचे ठिकाण | जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग |
| ७ | लिलाव पुर्व (Pre-Bid) बैठक | ई – निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या ठेकेदारांची लिलाव पुर्व (Pre-Bid) बैठक दिनांक १८/११/२०२५ रोजी सायं. ४.०० वाजता |
| ८ | प्रत्यक्ष ई–लिलावाचा दिनांक व वेळ | दि.२६/११/२०२५ रोजी वेळ सकाळी १०.०० वाजले पासुन ते सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत |

१. ई–निविदा तांत्रिक सहयोगी mahatenders यांची नियुक्ती करण्यांत आली आहे.
२. ई–निविदा प्रकियेसंबंधी सर्व माहिती, वाळू/रेती गट व उपगटाचा तपशील, सोबतचे परिशिष्ट अ, आणि निविदा प्रक्रिया अटी व शर्ती याची सविस्तर माहिती https://mahatenders.gov.in तसेच www.raigad.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करुन देण्यांत आली आहे.
३. निविदा धारकांनी निविदा अर्ज www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर भरणे आवश्यक आहे. तसेच प्रत्यक्षात संकेतस्थळावर भरण्यात आलेली कागदपत्रे व ऑनलाईन भरण्यात आलेली निवीदा शुल्क व अनामत रक्कम यांची पोच पावती खनिकर्म शाखेकडे विहित मुदतीत सादर केले जातील अशाच निविदाधारकांचा अर्जाचा विचार केला जाईल यांची सर्व निविदा धारकांनी नोंद घ्यावी.
४. ई–निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी मागील ३ वर्षाची आयकर विवरणपत्रे, पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र व निविदेतील अटी / शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र देणे बंधनकारक राहील.
५. ई– निविदा प्रकियेत भाग घेऊ इच्छिणाऱ्यास प्रत्येक वाळू/रेती गट व उपगटासाठी पुढीलप्रमाणे ना–परतावा शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा कराव्या लागतील. फॉर्म फी प्रत्येक वाळू/रेती गटाकरीता स्वतंत्र रु. २०००/–(१० लाखांपर्यंत अपसेट प्राईझ असलेल्या वाळू गटाकरीता) व रु. ५०००/–(१० लाखांपेक्षा जास्त अपसेट प्राईस असलेल्या वाळू/रेती गट व उपगटाकरिता).
६. ई–निवीदेच्या सूचना, आवश्यक पात्रता, सर्वसाधारण अटी शर्ती व इतर तपशिल निवीदा दस्तऐवजामध्ये पाहता येतील.
७. प्राप्त निविदा कारणे न देता अथवा स्विकारणेचे अधिकार जिल्हाधिकारी, रायगड यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहे.
८. ई–निविदामधील अटी व शर्ती ऑनलाईन पोर्टल www.mahatenders.gov.in वर देण्यात आलेले आहेत.
९. सदरची निविदा कोणत्याही किमान कामाचा हक्क प्रस्तापित करत नाही.
१०. ई–निविदा प्रक्रियेबाबत कोणत्याही अडचणी आल्यास ०२१४१–२२२११८ (खनिकर्म शाखा) या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

**क्रमांक खशा/गौख/कात १/निविदा/वाळू/रेती धोरण–२५/रायगड/२०२५**
**दिनांक :– १४/११/२०२५**
**ठिकाण : अलिबाग**

**आरओसी–२०२५–२६/क्र–५/C३९९०**

**सही/–**
**किशन ना. जावळे**
**जिल्हाधिकारी–रायगड**

# सिडकोची आंतरराष्ट्रीय एज्युसिटी नवी मुंबईची नवीन शैक्षणिक ओळख

**नवी मुंबई: रामप्रहर वृत्त**

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईतील पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ येथे उत्कृष्टता केंद्रा (सेंटर ऑफएक्सलन्स) अंतर्गत, अंदाजे १०० हेक्टर क्षेत्रावर आंतरराष्ट्रीय एज्युसिटी प्रकल्प विकसित करण्यात येतआहे. एकात्मिक आरोग्यविषयक व शैक्षणिक सुविधा, आंतरराष्ट्रीय मानकांचे क्रीडा संकुल व कौशल्य केंद्रउभारण्याच्या प्रमुख उद्देशाने उत्कृष्टता केंद्र हा प्रकल्प सिडकोतर्फे विकसित करण्यात येत आहे. या प्रकल्पाद्वारे नवी मुंबई हे नजीकच्या काळात जागतिक शिक्षण केंद्र म्हणून उदयास येणार आहे. या प्रकल्पाकरिता जमीन विकसित करण्याच्या कामाला गती देण्यात आली असून निविदा प्रक्रिया सुरू आहे.

१४ जून २०२५ रोजी सिडको, महाराष्ट्र शासन आणि यॉर्क विद्यापीठ, बरडीन विद्यापीठ, वेस्टर्नऑस्ट्रेलिया विद्यापीठ, इलिनॉइस इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी आणि आयईडी विद्यापीठ या पाच नामांकित परदेशी विद्यापीठां






दरम्यान सामंजस्य करारनामा करण्यात येऊन नवी मुंबईमध्ये कॅम्पस स्थापन करण्याकरिता या विद्यापीठांना इरादापत्रे प्रदान करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली, सिडकोच्या एज्युसिटी उपक्रमांतर्गत नवी मुंबईमध्ये जागतिक दर्जाच्या विद्यापीठांचे कॅम्पस स्थापन करण्यात येणार आहेत. कुंडेवहाळ येथे सुमारे १०० हेक्टरवर एज्युसिटी विकसित करण्यात येत असून ती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या ३-४ किमीच्या परिघात वसलेली आहे. या व्यतिरिक्त मल्टिमोडल कॉरिडॉर, समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग यांद्वारे देखील कनेक्टिव्हिटी लाभणार आहे. मुंबईहून वाहनाद्वारे एज्युसिटी एक तासाच्या अंतरावर असून एरोसिटी, नैना शहर, खारघर कार्पोरेट पार्क, गोल्फ कोर्स व पनवेल महानगरपालिका क्षेत्रापासूनही नजीकच्या अंतरावर आहे.

एज्युसिटीकरिता देण्यात आलेली जमीनीच्या सपाटीकरणाचे काम आवश्यक असून जमिनींचे सुलभरीत्या वाटप करता यावे म्हणून चार स्वतंत्र भूखंडांवर भूविकासाचे काम करण्यात येणार आहे. सिडकोतर्फे भाग-१ व भाग-२ मधील ५० हेक्टर जमिनीच्या विकासासह ४५ मी. ३० मी. रुंद प्रवेश मार्गाचे काम हाती घेण्यात आले असून ई-निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. ही कामे पूर्णत्वास गेल्यानंतर ४५ मी. रुंद मार्गाद्वारे राष्ट्रीय महामार्ग ३४८ (राष्ट्रीय महामार्ग ४बी) जेएनपीटी वरून एज्युसिटी येथे थेट प्रवेश मिळणार आहे. त्याचप्रमाणे सिडको नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ते पनवेल रेल्वे स्थानक जोडणारी मेट्रो लाईन एम-२४ ची योजना आखत आहे,

> **नवी मुंबईला जागतिक शिक्षण केंद्र बनवण्याकरिता सिडकोची कटिबद्धता अधोरेखित करणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. प्रकल्पाच्या भूविकासाची कामे व ई-निविदा प्रक्रिया यांना सुरुवात झाली असून देशाच्या शिक्षण क्षेत्रातील हा क्रांतिकारी प्रकल्प ठरणार आहे. आंतरराष्ट्रीयएज्युसिटी एक ऐतिहासिक उपक्रम असून ज्यामध्ये एकाच ठिकाणी एकाच कॅम्पसमध्ये १० हून अधिकआंतरराष्ट्रीय विद्यापीठे सामील असतील - हा देशातील अशा प्रकारचा एकमेव उपक्रम ठरेल -विजय सिंघल,** सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक

# वाशी विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**



आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने वाशी विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

वाशी विभाग कार्यक्षेत्रातील वाशीगाव, सेक्टर-३० उच्च दाबाच्या वाहीनीखाली येथे बेकायदेशीर अनधिकृत झोपडपटटया वसलेल्या आहेत.सदर अनधिकृत झोपडपटटयांवर आज दिनांक १३ नोव्हेंबर रोजी सी विभाग वाशी कार्यालयामार्फत तोडक कारवाई करुन अंदाजे २५० ते ३०० अनाधिकृत झोपड्या निष्कासित करण्यात आल्या.या धडक मोहिमेसाठी वाशी विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी सुखदेव येडवे, विभाग कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच स्थानिक पोलीस, अतिक्रमण पोलीस, १५ मजूर, २ जेसीबी व १ आयसरच्या सहाय्याने निष्कासित करण्यात आले.यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात पं. नेहरू जयंती साजरी

**उलवे : रामप्रहर वृत्त**

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय, उलवे येथे नेहरू जयंती कार्यक्रम स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक भरणुके यांनी प्रतिमेचे पूजन केले, तर सांस्कृतिक विभागप्रमुख भारती म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. नेहरूंचे मुलांविषयीचे प्रेम देशाचे उत्तम नेतृत्व व विकासात्मक धोरण याबद्दल विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले, तर कमला नेहरू, इंदिरा गांधी, आनंद भवन याविषयी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना सांगितली.

# मोरू नारायण म्हात्रे व फुंडे विद्यालयात बालदिन साजरा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स येथे शुक्रवार दिनांक १४ नोव्हेंबर रोजी भारताचे पहिले पंतप्रधान स्वर्गीय श्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनी, विद्यार्थ्यांसाठी विविध आनंदायी , कलापूर्ण, अभिव्यक्ती कौशल्य, सर्जनशील, उपक्रमांद्वारे बालदिन साजरा करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी दप्तर विना शालेय आनंददायी दिवस या शीर्षका अंतर्गत , प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी वेशभूषा स्पर्धा, माध्यमिक विभागासाठी पाककला स्पर्धा , फूड स्टॉल स्टॉल तसेच माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यां साठी विशेष परिपाठाचे शिक्षकांनी स्वतः परिपाठाचे नियोजन तसेच सादरीकरण केले . बाल दिनाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी दीप प्रज्वलनाने केले, व भारताचे पहिले पंतप्रधान श्री पंडित जवाहलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी फूड स्टॉल अंतर्गत, पाणीपुरी ,भेलपुरी, मिसळपाव, खमण ढोकळा, मोमोज, विविध प्रकारची शीतपेय, स्वतः तयार करून त्याचा सर्व विद्यार्थ्यांनी आस्वाद घेतला. प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी वेशभूषा स्पर्धेमध्ये त्यांचा आवडते व्यक्तिमत्व , पाणी वाचवा, वसुंधरा संवर्धन, या विषयावर त्यांनी विविध आकर्षक वेशभूषा करून स्वतःबद्दलची माहिती सांगितली. विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी स्वतः परिपाठाचे नियोजन केले, दिन महत्व, प्रश्नमंजुषा, दैनंदिन बातम्या तसेच बाल दिनाचे महत्त्व विशद करणारे हिंदी मधून श्री संतोष पवार , इंग्रजीतून श्री राहुल म्हात्रे यांनी भाषण केले. शाळेचे पर्यवेक्षक श्री अरुण जोशी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व विद्यार्थ्यांना बाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेतपंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती 'बालदिन' म्हणून साजरी करण्यात आली.

विद्यालयाचे प्राचार्य बी.बी. साळुंखे, उपप्राचार्या एस.डी.थोरात, पर्यवेक्षिका एस.एम.बाबर , एस.एस. पाटील वलेखनिक नवनीत ठाकूर तसेच सर्व सेवकवृंद यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याप्रतिमेचे पूजन करण्यात आले.स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस संपूर्णभारतभर 'बालदिन' म्हणून साजरा केला जातो.

याप्रसंगी विद्यालयातील कु.श्रेया शिंदे , कु.सिफा शेख यांनी पंडित नेहरू यांचे जीवनकार्य सांगितले तसेच कु.स्नेहल केदार या विद्यार्थीनीने मुले आहेत भविष्य देशाचे यागीताचे सुमधुर आवाजात सादर केले. त्यानंतर विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक आर. जी.शेळकेयांनी मनोगत व्यक्त केले. आजची मुल म्हणजे उद्याच्या भारताचे शिल्पकार आहेत म्हणूनचबालदिन हा मुलांच्या आनंदासाठी त्याच्या हक्कांसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी साजराकेला जातो. विविध उदाहरणे देत आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.एन.पाटील यांनी केले.



## उरण महाविद्यालयात अमली पदार्थ जनजागृती



**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात अंमली पदार्थ जागृती व सायबर गुन्हे या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन केले गेले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाल्मीक गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात राजेश तुकाराम खांदवे (सहाय्यक पोलीस निरीक्षक, उरण पोलीस स्टेशन यांनी अमली पदार्थविरोधी कायदे व विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच सायबर फ्रॉड कसे होतात हे सांगुन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विद्यार्थ्यांची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले.तसेच विद्यार्थी म्हणून जीवन जगताना कशा पद्धतीने वाटचाल करावी याविषयी दिशा दाखवली व मोलाचा सल्ला दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ प्रा. व्ही.एस. इंदुलकर हे होते त्यांनी विद्यार्थ्यांनी शिस्त पालन करून अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सह कार्यक्रम अधिकारी प्रा. सौ. विनिता तांडेल यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# नेरे परिसरात रस्ता, समाजमंदिराचे भूमिपूजन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नेरे परिसरात कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून अंतर्गत रस्ता आणि समाजमंदिराचे भूमिपूजन शुक्रवारी (दि. १४) भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

नेरेपाडा येथे अंतर्गत रस्ता करण्यात येणार आहे, तर नेरेपाडा कातकरीवाडी येथे समाजमंदिराची उभारणी करण्यात येणार आहे. या माध्यमातून तेथील ग्रामस्थांना सुविधा उपलब्ध होणार आहे.

या कार्यक्रम सरपंच प्रकाश गोपाळ घाडगे, सदस्य शैलेश जाधव, दिनेश मानकामे, कल्पना वाघे, माया म्हात्रे, आंबो रोडपालकर, माजी उपसरपंच वंदना रोडपालकर, माजी सदस्य गोटीराम म्हात्रे, शशिकांत रोडपालकर, योगेश रोडपालकर, रोहिदास भगत, ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंत रोडपालकर, बाळकृष्ण म्हात्रे, रूपेश म्हात्रे, माया रोडपालकर, दत्तात्रय भगत, महेंद्र गायकर, गजानन भगत, बाळू वाघे, पोशा वाघे, सुरेश वाघे, गोपाळ वाघे, गोपाळ रोडपालकर, तस्मय राज पाटील आदी उपस्थित होते.

**पनवेल : बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणित एनडीएने मिळवलेल्या भव्य विजयाचा देशभरात जल्लोष होत असताना त्याचे प्रतिबिंब पनवेलमध्येही दिसले. भाजप मध्यवर्ती कार्यालय व आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयाबाहेर भाजप कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव व्यक्त केला. बिहारमधील विजयाची बातमी समजताच कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप आणि एनडीएचा जयघोष केला तसेच कार्यालयाबाहेर मिठाई वाटप केले. पनवेलसह रायगडच्या विविध भागातही एनडीए विजयाचा जल्लोष करण्यात आला.**





**उलवे नोड : येथील सेक्टर २४मधील नॅशनल केमिस्ट या मेडिकल स्टोअरचे उद्घाटन भाजप महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष निकिता खारकर यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजपचे गव्हाण जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष निलेश खारकर, पनवेल पश्चिम मंडल उपाध्यक्ष सुहास गोंधळी, गीता ठाकूर, दीपक गोंधळी, प्रतिश पाटील, गायकवाड गुरुजी, तेजस पेंढारी, नंदू ठाकूर तसेच मेडिकल स्टोअरचे मालक आणि त्यांचा परिवार उपस्थित होता.**



**पनवेल : राज्य शासन आयोजित हौशी नाट्यस्पर्धेत सहभागी झालेल्या पनवेलमधील महाराष्ट्र लोककल्याण सेवा संस्था आणि रिफ्लेक्शन थिएटर प्रस्तुत इतना सन्नाटा क्यू है भाई या नाटकाच्या सरावासाठी भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस तथा माजी नगरसेवक नितीन पाटील यांनी आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहातील हॉल विनामूल्य उपलब्ध करून दिला. नाटकाच्या सरावावेळी त्यांनी स्वतः नाट्यगृहाला भेट देत कलाकारांना प्रोत्साहन दिले. या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मृण्मय काणे, लेखक-दिग्दर्शक संकेत गायकवाड, प्रसिद्धी प्रमुख प्रसाद हनुमंते यांच्याकडून नितीन पाटील यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.**

# नगर परिषद निवडणुकीची रणधुमाळी

## महाडमध्ये सर्वप्रथम भाजप उमेदवाराचा अर्ज

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगर परिषद निवडणूक उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शुक्रवारी (दि. १४) पाचव्या दिवशी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस युतीचे उमेदवार सुमित मोहन पवार यांनी आपला सर्वप्रथम अर्ज दाखल केला.

भाजपचे सुमित पवार यांनी प्रभाग क्रमांक ८ ब मधून खुल्या प्रवर्गासाठी आपला अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तथा महाडचे तहसीलदार महेश शितोळे यांच्याकडे सादर केला. आमचा हा विजयाचा उमेदवारी अर्ज असल्याची भावना या वेळी भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बिपिन महामुणकर यांनी व्यक्त केली.

अर्ज भरतेवेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते धनंजय देशमुख, माजी नगराध्यक्ष संदीप जाधव, दक्षिण मंडळ अध्यक्ष निलेश तळवटकर, माजी तालुका सरचिटणीस महेश शिंदे, शिवाजी दरेकर, स्वप्नील ठोंबरे, कौशिक पोरे, माधव रानडे, ऋषिकेश गांगण, सागर हिरवे, अखिल जोशी, साहिल हेलेकर आदी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## मुरूडमध्ये आठ अर्ज दाखल



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५करिता उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अखेर सुरुवात झाली आहे. गुरुवारी व शुक्रवारी मिळून आठ अर्ज दाखल झाले.

मुरुड जंजिरा पालिकेची सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबरला होत असून त्याकरिता उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. चौथ्या दिवशी गुरुवारी नगरसेवकपदाकरिता शिवसेना शिंदे गटाकडून हर्षल अविनाश दांडेकर यांनी प्रभाग क्रमांक ६ ब व प्रभाग १ ब मधून अ निवडणूक निर्णय अधिकारी आदेश डफल यांच्याकडे अर्ज दाखल केला. त्याचप्रमाणे अन्य तिघांनी आपले अर्ज सादर केले, तर शुक्रवारी तीन जणांनी अर्ज भरले.

या वेळी शिवसेना शिंदे गट उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, मुरूड शहरप्रमुख संदीप पाटील, माजी नगरसेवक अविनाश दांडेकर, अरविंद गायकर, सुशील ठाकूर आदी उपस्थित होते.

# कोरस कंपनीतील स्टाफ कामगारांचे ठिय्या आंदोलन

### *वेतनवाढीच्या मागणीवर ठाम, भाजपचा पाठिंबा*



**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक वसाहतीतील कोरस कंपनीत भारतीय मजदूर संघाच्या युनियनमधील स्टाफ कामगारांनी वेतनवाढीच्या मागणीसाठी सुरू केलेले ठिय्या आंदोलन तिसऱ्या दिवशीही सुरूच होते. या आंदोलनाला भारतीय जनता पक्षाने पाठिंबा दिला आहे.

काही दिवसांपूर्वी याच कंपनीतील कंत्राटी कामगारांनी बोनस व एलएटीसाठी काम बंद आंदोलन केले होते. त्यांचा निर्णय पूर्ण होतो तोच स्टाफ कामगारांनी आंदोलनाला सुरुवात केली. कामगारांनी कंपनीच्या मुख्य गेटसमोर ठिय्या देऊन प्रशासनाकडून ठोस उत्तर मिळेपर्यंत मागे न हटण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

या आंदोलनात सुमारे ६५ ते ७० कामगार सहभागी असून भारतीय मजदूर संघ स्टाफ असोसिएशनच्या नेतृत्वाखाली आंदोलन शांततेच्या मार्गाने सुरू आहे. कामगारांचे म्हणणे आहे की, जोपर्यंत कंपनी प्रशासन लेखी स्वरूपात पगारवाढीचा निर्णय देत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील.

भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी प्रमुख पदाधिकाऱ्यांच्यासह आंदोलनाला भेट दिली. या वेळी त्यांनी कामगारांशी चर्चा केली. ते म्हणाले की, भारतीय मजदूर संघ युनियन कामगारांच्या न्याय्य मागण्यांना आम्ही पूर्ण पाठिंबा देत आहोत. कंपनी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली पाहिजे, अन्यथा कामगारांचा रोष वाढू शकतो.

# चव्हाणवाडी ग्रामस्थांचा राष्ट्रवादीत प्रवेश



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील महाड विधानसभा मतदारसंघातील चव्हाणवाडी ग्रामस्थांनी खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि.१३) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी खासदार तटकरे यांनी विकासाची ग्वाही दिली.


या कार्यक्रमास राष्ट्रवादीचे कोकण विभाग प्रवक्ते ॲड.राजीव साबळे, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, प्रदेश युवक सचिव दीपक जाधव, जिल्हा कार्याध्यक्ष शादाब गैबी, तालुकाध्यक्ष काका नवगणे, ज्येष्ठ नेते महादेव बक्कम, शेखर देशमुख, बाबूशेठ खानविलकर, सुशांत जांबरे, उदय अधिकारी, सुभाष दळवी, संगीता बक्कम, शैलेश भोनकर, संदेश मालोरे, महेश महाजन, रत्नाकर उभारे, रूपेश तोडकर, ॲड.सुशील दसवते, सुनील पवार, संतोष यादव, अशोक पाटील, दीपक उभारे, प्रमोद मोरे, उद्धव जाधव, विरेश येरुणकर आदी उपस्थित होते.

या वेळी चव्हाणवाडी गावचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांच्यासह बंधू-भगिनी यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. खासदार तटकरे यांनी त्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पारूनाथ मुंढे यांनी केले.

# नाचणी, वरीच्या नुकसानभरपाईची मागणी

**पाली : प्रतिनिधी**

लांबलेल्या परतीच्या पावसामुळे रायगड जिल्ह्यातील भातशेतीचे अतोनात नुकसान तर झालेच आहे, शिवाय येथील हक्काच्या नाचणी व वरी या नगदी पिकांवर संकट ओढावले आहे. सुधागड तालुक्यातील उसर येथील शेतकरी सदानंद मानकर यांच्या दोन एकरावरील हाताशी आलेले नाचणी व वरीचे पीक परतीच्या पावसामुळे अक्षरशः उद्ध्वस्त झाले आहे.



रायगड जिल्ह्यात अनेक शेतकरी व आदिवासी बांधव डोंगर उतारावर पावसाळा गेल्यावर नाचणी व वरीची शेती करतात. ही सर्व पिके शेतकऱ्यांना रोख उत्पन्न देतात, मात्र आता या सर्वांना नुकसानीला व अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. भातशेतीबरोबरच जिल्ह्यात बहुतांश तालुक्यात माळरान किंवा वरकस जमिनीवर शेतकरी व आदिवासी बांधव वरी व नाचणीची शेती करतात. जिल्ह्यात नाचणी जवळपास साधारण सहा ते सात हजार हेक्टरवर केली जाते आणि वरी जवळपास साधारण १०० हेक्टरवर केली जाते.

जिल्ह्यात सुधागड, श्रीवर्धन, खालापूर, तळा, म्हसळा, महाड, पोलादपूर, पेण, कर्जत अशा आदिवासीबहुल तालुक्यांत व इतरही काही ठिकाणी वरी व नाचणीचे पिक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. हाती आलेले पीक विकून दोन पैसे त्यांना मिळतात. या पैशातून त्यांचा काही दिवसांचा घर खर्च चालतो. शिवाय वरी व नाचणी रोजच्या खाण्यासाठीदेखील मिळते, मात्र यंदा परतीच्या पावसाने मुक्काम वाढविला. परिणामी नुकसानीला सामोरे जावे लागले. निसर्गाचा प्रकोप आणि प्रशासनाचे दुर्लक्षामुळे शेतकरी व आदिवासी बांधव या शेतीपासून भविष्यात लांब जाण्याची भीती आहे. या नुकसानीबद्दल शेतकरी सदानंद मानकर यांनी शासनाकडे नुकसानभरपाईची मागणी केलीय.

# खांदाडमध्ये तरुणांनी पकडली मगर; ग्रामस्थांना दिलासा

**माणगाव : बातमीदार**

खांदाड गावात गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेल्या मगरदर्शनाच्या घटनांमुळे ग्रामस्थ भयभीत वातावरणात जीवन जगत होते. गावातील तरुणांनी मोठ्या धाडसाने एक मगर जिवंत पकडून दिलासा दिला.



मागील काळात ग्रामस्थांनी वनविभागाचे थेट लक्ष वेधून घेतले, माध्यमांतूनही सातत्याने पाठपुरावा केला होता. तरीही फक्त हिरव्या जाळीची फेन्सिंग आणि सावधान! मगरींचे प्राबल्य अशा फलकापलीकडे ठोस उपाययोजना दिसून आली नाही. त्यामुळे मगरींची संख्या वाढत गेली आणि कोंबड्या, कोंबडे, पिल्ले व लहान पाळीव जनावरांवर हल्ले सुरूच राहिले.

अखेर रात्री ८.१० वाजता भीमसेन वले यांच्या घरासमोर मगर आल्याची बातमी पसरताच गावातील असंख्य तरुण घटनास्थळी जमा झाले. मंडळाचे अध्यक्ष महेश पोवार आणि सहकाऱ्यांनी कौशल्याने व कोणतीही इजा न करता मगरीला झडप घालून पकडण्यात यश मिळवले.

युवक निखिल वले याने त्यानंतर तालुका वनअधिकारी प्रशांत शिंदे यांना कळविले. वनपथक घटनास्थळी पोहचले, मात्र आवश्यक पकड उपकरणांचा अभाव असल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. अखेर गावकऱ्यांनी पकडलेली मगर वनपथकाच्या ताब्यात दिली व नंतर पिंजरा आणून तिला वाहनात सुरक्षितरीत्या हलविण्यात आले.

गावकऱ्यांची मागणी आहे की पकडलेल्या मगरीला दूरवर समुद्रवाहिनीच्या परिसरात सुरक्षित सोडण्यात यावे, अन्यथा ती पुन्हा गावात प्रवेश करू शकते. ही प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू राहिली व सुमारे १०च्या सुमारास सर्व औपचारिकता पूर्ण झाली. वनविभागाच्या अपुऱ्या कारवाईविरुद्ध ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. गावकऱ्यांनी स्वतःच्या जिवाची पर्वा न करता मगर पकडली, पण वनविभागाकडून अजूनही ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना दिसत नाहीत. भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडण्यापूर्वी त्वरित पावले उचलावीत, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

# कंटेनर दरीत कोसळून चालक ठार

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील जुन्या महामार्गाजवळील मिळगाव ठाकूरवाडी शुक्रवारी (दि. १४) येथे एक कंटेनर खोल दरीत पडला. या अपघातात कंटनेरच्या केबिनमध्ये चालक अडकून त्याचा जागीच मृत्यू झाला आहे.

पुण्याहून मुंबईकडे कंटेनर (एमएच २३ डब्ल्यू ३०७७) हा चालक कर्मराज रामनारायण (वय ४५, रा. कटघरपट्टी कादीपूर जी, सुलतानपूर, उत्तर प्रदेश) हा घेऊन जात होता. तो खोपोली एक्झिट घेऊन खोपोलीकडे भरधाव वेगात जात असताना तीव्र उतारावरील मिळ ठाकूरवाडी जवळ आला असता चालकाचे कंटेनर वरील नियंत्रण सुटल्याने कंटेनर समोरील खोल दरीत पडून पलटी झाला. यात कंटेनरच्या केबिन मध्ये चालक अडकून त्याचा छातीला गंभीर दुखापत त्याचा जागीच मृत्यू झाला.

पोलीस आयआरबी टीम, मृत्युंजय टीम आदींनी घटनास्थळी दाखल होत मृतदेह बाहेर पुढील कार्यवाहीसाठी ग्रामीण रुग्णालय खालापूर येथे पाठविण्यात आला आहे.

# सहयोग पतसंस्थेकडून वात्सल्य ट्रस्टला देणगी



**अलिबाग : प्रतिनिधी**

सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अलिबाग या पतसंस्थेने सामाजिक बांधिलकी जपत आपल्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त वात्सल्य ट्रस्टला २५ हजार रुपयांचा देणगी धनादेश प्रदान केला.

बालदिनाच्या औचित्याने शुक्रवारी (दि. १४) पतसंस्थेच्या संचालिका जागृती जितू शिगवण यांच्या हस्ते वात्सल्य ट्रस्टच्या शोभा उदय जोशी व मेहंदळे यांना देणगी प्रदान करण्यात आली. ही देणगी रौप्यमहोत्सवी वर्षासाठी संकलित सामाजिक उपक्रम निधीतून देण्यात आली.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष योगेश मगर, उपाध्यक्ष संजय पाटील, संचालक सुनील तांबडकर, नीळकंठ केमकर, मोहन वैद्य, तज्ज्ञ संचालक चिंतामणी मकू, संचालिका प्रा.श्रावणी मगर, व्यवस्थापक वैभव बोर्लीकर तसेच कर्मचारीवर्गातील न.ल.पाटील आदी उपस्थित होते.

# वारकरी दिंड्यांचे स्वागत व सेवा

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून वारकरी दिंड्या आळंदीकडे रवाना झाल्या. तत्पूर्वी त्यांचे खोपोली शहरात आगमन झाले आणि समस्त वातावरण भगवेमय झाले होते.

वेगवेगळ्या भागातून आलेल्या दिंड्यांचे महामार्गावर आगमन झाले. या दिंड्यांचा खोपोली व परिसरातील गावांमध्ये सुरुवातीला विसावा होता. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत भजनाच्या माध्यमातून अभंगाच्या माध्यमातून सूर कानावर पडत होते. खोपोली शहरातील विविध भागातील मान्यवर कार्यकर्त्यांनी या दिंड्यातील वारकऱ्यांची चहा नाश्ता व भोजनाची सोय केली. पहाटेच्या सुमारास या दिंड्या खंडाळा घाटमार्गे आळंदीच्या दिशेने मार्गस्थ झाल्या.

# उसरोलीत आगरी समाजाच्या स्मशानभूमी शेडचे भूमिपूजन



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील उसरोली गावच्या आगरी समाज स्मशानभूमी दहन शेडचे भूमिपूजन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, नांदगावचे माजी सरपंच भाई सुर्वे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

या कामासाठी रायगड जिल्हा नियोजन मंडळाच्या वतीने सुमारे नऊ लाखांच्या निधीची तरतूद रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या शिफारशीनुसार करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे मुरूड तालुकाध्यक्ष फैरोज घलटे यांनी या वेळी दिली. ही शेड लवकरात लवकर बांधून देण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. कार्यक्रमास राष्ट्रवादीचे नेते, माजी उपसभापती बाबू नागावकर, माजी सरपंच अजित कासार, उसरोली आगरी समाजाचे अध्यक्ष महेश पाटील, माजी अध्यक्ष गोविंद भोईर व समाज बांधव उपस्थित होते.

# आफ्रिकेचा पहिला डाव १५९ धावांत संपुष्टात

## बुमराहचा 'पंजा'; भारत पहिल्या दिवसाअखेर १ बाद ३७ धावा



**कोलकाता : वृत्तसंस्था**

ईडन गार्डनच्या मैदानावर भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवसावर भारतीय गोलंदाजांनी विशेषत: वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने वर्चस्व गाजवले. बुमराहच्या धारदार गोलंदाजीपुढे दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव अवघ्या १५९ धावांत संपुष्टात आला. प्रत्युत्तरादाखल पहिल्या दिवसाअखेर भारताने एक गडी गमावून ३७ धावा केल्या असून संघ अजूनही १२२ धावांनी पिछाडीवर आहे.

टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या पाहुण्या दक्षिण आफ्रिकेच्या संघाला भारतीय वेगवान गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच धक्के दिले. ओपनर एडन मार्करम आणि रायन रिकेल्टन यांनी पहिल्या विकेटसाठी ५७ धावांची अर्धशतकी भागीदारी करत चांगली सुरुवात केली, मात्र जसप्रीत बुमराहने रिकेल्टनला (२३) बाद करत भारताला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर लगेचच धावसंख्या ६२ असताना बुमराहने मार्करमलाही (३१) तंबूचा रस्ता दाखवला. कर्णधार टेंबा बावुमा तीन धावा करून लवकर बाद झाला. लंच ब्रेकपर्यंत दक्षिण आफ्रिकेचा स्कोर ३ बाद १०५ असा होता.

दुसऱ्या सत्रात दक्षिण आफ्रिकेचा डाव पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळला. वियान मुल्डर (२४), टोनी डी जोरजी (२४), काईल व्हेरेन्ने (१६), मार्को येन्सन (०) आणि कॉर्बिन बॉश (३) स्वस्तात बाद झाले. वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने आपल्या एकाच षटकात व्हेरेन्ने आणि येन्सनला बाद करत पाहुण्यांना मोठे धक्के दिले. चहापानापर्यंत दक्षिण आफ्रिकेने आठ गडी गमावून १५४ धावा केल्या होत्या.

बुमराहने आपला भेदक मारा कायम ठेवत कारकिर्दीतील १६वा पाच विकेट हॉल पूर्ण केला. त्याने रिकेल्टन (३१) आणि मार्करम (३१) यांना बाद केल्यानंतर टोनी डी जोरजी (२४), सायमन हार्पर (५) आणि केशव महाराज (०) यांनाही पॅव्हेलियनमध्ये पाठवले. त्याने १४ षटके गोलंदाजी करत पाच निर्धाव षटके टाकत केवळ २७ धावांमध्ये पाच महत्त्वाचे बळी घेतले.

दक्षिण आफ्रिकेला १५९ धावांत गुंडाळल्यानंतर भारतालाही अपेक्षित सुरुवात मिळाली नाही. युवा सलामीवीर यशस्वी जैस्वाल २७ चेंडूत १२ धावा करून मार्को येन्सनच्या गोलंदाजीवर बोल्ड झाला. यानंतर, अनुभवी फलंदाज केएल राहुल आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी संयमी फलंदाजी करत दिवसाचा उर्वरित खेळ यशस्वीरित्या पार पाडला. स्टम्प्सच्या वेळी राहुल ५९ चेंडूंमध्ये १३ धावा आणि सुंदर ३८ चेंडूंमध्ये सहा धावा काढून खेळत आहेत.

### कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धा

# मुलांमध्ये लांजा, मुलींमध्ये कुडाळ कॉलेज विजेते



**पाली : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठ अंतर्गत कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन मुले व मुलींची खो-खो स्पर्धा नुकतीच सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या पाली येथील शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयातील जनरल अरुणकुमार वैद्य क्रीडांगणावर झाली. या स्पर्धेत मुलांमध्ये एएससी कॉलेज लांजा, तर मुलींमध्ये एसआरएम कॉलेज कुडाळने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेचे उद्घाटन तहसीलदार उत्तम कुंभार यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभास प्रमुख मान्यवर म्हणून नगराध्यक्ष पराग मेहता, 'सुएसो'च्या अध्यक्ष गीता पालरेचा, उपाध्यक्ष रवींद्र लिमये, सचिव ग.रा. म्हात्रे, संचालिका तृप्ती मराठे, हर्षा चांदोरकर, बल्लाळेश्वर देवस्थानचे सरपंच जितेंद्र गद्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुधाकर लहूपचांग, कोकण विभागीय क्रीडा समिती समन्वयक शशांक उपशेटे, सचिव चंद्रकांत नाईक, महाविद्यालयातील कार्यालयीन अधीक्षक चंद्रकांत चिले, क्रीडा विभाग प्रा. संतोष भोईर, जिमखाना प्रमुख संजय काटकर, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे नामांकित पंच, विविध महाविद्यालयातील क्रीडा संचालक, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेसाठी कोकण विभागातील मुलांचे १३ व मुलींच्या नऊ संघांनी नाव नोंदवून एकूण १३९ मुले व ८६ मुलींनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मुलांमध्ये एएसपी कॉलेज देवरूख व जेएसएम कॉलेज अलिबाग यांनी; तर मुलींमध्ये जेएसएम कॉलेज अलिबाग व एसपीके कॉलेज सावंतवाडी यांनी प्राप्त केले.

या संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंमधून कोकण विभागाचा मुले व मुली यांचा संघ निवडला जाईल व हे संघ मुंबई विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेसाठी पाठवले जातील.

स्पर्धा यशस्वीतेसाठी पालीवाला महाविद्यालय क्रीडा विभाग सदस्य प्रा. दिपाली बांगारे, प्रा. महेश राहीन्ज, प्रा. रुकसार महाडकर, क्रीडा शिक्षक चिंतामण शिंगवा, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांनी मेहनत घेतली. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. संदेश गावडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. स्नेहल बेलवलकर मानले.

# 'सीकेटी'च्या विद्यार्थिनींची किकबॉक्सिंगमध्ये चमक



## रिया मौर्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि मुंबई उपनगर क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न राजीव गांधी क्रीडा संकुल धारावी येथे झालेल्या मुलींच्या विभागीय किकबॉक्सिंग स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींनी सुयश प्राप्त केले.

रिया राजेश मौर्या (बारावी कॉमर्स) या विद्यार्थिनीने प्रथम, तर ईश्वरी उमेश गायकवाड (बारावी सायन्स) हिने द्वितीय क्रमांक पटकावला. प्रथम क्रमांक प्राप्त रियाची चंद्रपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# 'आरटीपीएस'च्या ह्रिदिशा कारंडेला राष्ट्रीय स्पर्धेत दोन पदके



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी ह्रिदिशा अभिषेक कारंडे हिने २०व्या राष्ट्रीय एरोबिक्स आणि हिप-हॉप चॅम्पियनशिप २०२५मध्ये सुवर्ण आणि कांस्यपदक पटकाविले.

स्पर्धा उत्तर प्रदेशातील अयोध्या येथे आयोजित करण्यात आल्या होती. यामध्ये ह्रिदिशा कारंडेने ११ वर्षाखालील मुलींच्या विविध स्पर्धेत सहभाग घेऊन दोन पदके जिंकली.

याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी ह्रिदिशाचे अभिनंदन व कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय पीआरओ बाळासाहेब कारंडे उपस्थित होते.

# गतिमंदांच्या पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी भारतीय खेळाडू रोमानियाला रवाना



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोमानियातील कल्ज न्यापोका येथे जागतिक खुली इक्विपड गतिमंद पुरुष व महिलांची चॅम्पियनशिप तसेच विशेष ऑलिम्पिक चॅम्पियनशिप होणार आहे. या स्पर्धेसाठी भारतीय संघ हैदराबाद येथून १२ नोव्हेंबर रोजी रवाना झाला.

या संघामध्ये संजू हॅरोल्ड, विष्णू मोहन, विष्णू विजय कुमार या खेळाडूंचा समावेश आहे, तर प्रशिक्षक म्हणून निखिल व्ही.एस. आणि व्यवस्थापक म्हणून सॅम्युअल एम.व्ही. यांच्याकडे जबाबदारी आहे. संघासोबत शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त, आंतरराष्ट्रीय पंच आणि महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग संघटनेचे सचिव संजय सरदेसाई हे पंच व प्रशिक्षक म्हणून म्हणून रवाना झाले.

पॉवरलिफ्टिंग इंडियाचे सेक्रेटरी अर्जुन पुरस्कारप्राप्त पी.जे. जोसेफ आणि अध्यक्ष सतीश कुमार यांनी भारतीय संघाला शुभेच्छा दिल्या आहेत.

# पाच विकेट्स घेत बुमराहचा मोठा पराक्रम




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोलकाता येथील इडन गार्डन्सच्या मैदानात रंगलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात जसप्रीत बुमराहने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. १४ षटकात २३ धावा खर्च करताना जसप्रीत बुमराहनं दक्षिण आफ्रिकेचा अर्धा संघ तंबूत धाडला. रेड बॉल क्रिकेटमध्ये पहिल्या दिवशी पाच विकेट्स हॉलचा डाव साधणारा तो पहिला भारतीय जलदगती गोलंदाज ठरला आहे.

याआधी २०१९मध्ये इशांत शर्मा याने कसोटीत अशी कामगिरी केली होती, पण त्याने डे नाईट क्रिकेट सामन्यात हा डाव साधला होता. २००८मध्ये दक्षिण आफ्रिकेचा जलदगती गोलंदाज डेल स्टेन याने कसोटी सामन्यात पहिल्या दिवसाच्या खेळात पाच विकेट्सचा डाव साधला होता. त्यानंतर अशी कामगिरी करणारा बुमराह दुसरा गोलंदाज आहे.

बुमराहने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात पाच विकेट्स घेत भागवत चंद्रशेखर या दिग्गज भारतीय गोलंदाजाची बरोबरी साधली. भागवत चंद्रशेखर यांनी ५८ डावात कसोटीत १६ वेळा पाच विकेट्सचा डाव घेतला होता. बुमराहने ५१व्या सामन्यात १६व्या वेळी अशी कामगिरी करून दाखवली आहे. या यादीत आर. अश्विन अव्वलस्थानी आहे. त्याने आपल्या कसोटी कारकिर्दीतील १०६व्या सामन्यात ३७व्या वेळी पाच विकेट्सचा डाव साधला होता.

दक्षिण आफ्रिकेकडून रायन रिकल्टन आणि एडेन मारक्रम ही जोडी मैदानावर आली होती. बुमराहने आधी रिकल्टनला त्रिफळाचित केले. त्यानंतर वेगवान उसळी घेणारा चेंडू टाकून त्याने मारक्रमलाही बाद केले. रिकल्टन बाद होताच बुमराहने मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. त्याला बाद करण्यापूर्वी बुमराहने १५१ फलंदाजांना त्रिफळाचित केले होते. दरम्यान रिकल्टन हा बुमराहच्या गोलंदाजीवर त्रिफळाचित होणारा १५२वा फलंदाज ठरला आहे. यासह त्याने माजी गोलंदाज आर अश्विनला मागे टाकले आहे. अश्विनने १५१ फलंदाजांना त्रिफळाचित केलं होते. आता बुमराह अश्विनला मागे टाकून पुढे निघाला आहे. या यादीत भारताचे माजी गोलंदाज अनिल कुंबळे अव्वल स्थानी आहेत. त्यांनी १८६ फलंदाजांना त्रिफळाचित केले आहे, तर माजी कर्णधार कपिल देव दुसऱ्या स्थानी आहेत. त्यांनी १६४ फलंदाजांना त्रिफळाचित केले होते.

# 'एमआय'मध्ये येताच शार्दुलच्या नावे मोठा विक्रम

## आयपीएलमध्ये तीन वेळा ट्रेड होणारा पहिलाच खेळाडू

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२५ स्पर्धेच्या लिलावापूर्वी खेळाडूंच्या ट्रेडची जोरदार चर्चा रंगली आहे. सर्व संघांना १५ नोव्हेंबरपर्यंत आपल्या रिटेन आणि रिलीज केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करावी लागणार आहे. त्याआधी ट्रेड डीलबाबत अनेक बातम्या समोर आल्या आहेत. संजू सॅमसन चेन्नई सुपर किंग्ज संघात जाणार आणि रवींद्र जडेजा राजस्थान रॉयल्समध्ये येणार असल्याची चर्चा रंगली आहे. दरम्यान, पाच वेळचा चॅम्पियन संघ मुंबई इंडियन्सने शार्दुल ठाकूरला ताफ्यात स्थान दिले आहे.

शार्दुल ठाकूर गेल्या हंगामात लखनौ सुपर जायंट्स संघाकडून खेळताना दिसून आला होता. आगामी हंगामापूर्वी मुंबई इंडियन्सने शार्दुलला दोन कोटी रोख रक्कम मोजून आपल्या संघात स्थान दिले आहे. मुंबई आणि लखनौने कुठल्याही खेळाडूंची अदलाबदल न करता रोख रक्कम देऊन शार्दुलला आपल्या संघात स्थान दिले. यादरम्यान शार्दुलच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे.



आयपीएल २०१७ स्पर्धेआधी रायझिंग पुणे सुपरजायंट्स संघाने शार्दुलची पहिल्यांदा ट्रेड डील केली होती. त्यावेळी तो पंजाब किंग्ज संघाकडून खेळायचा. त्यानंतर २०२३मध्ये दिल्लीकडून खेळणाऱ्या शार्दुलला कोलकाता नाईट रायडर्सने ताफ्यात स्थान दिले. दोनदा ट्रेड डील झाल्यानंतर आता शार्दुल आयपीएल लिलावाआधी होणाऱ्या ट्रेड डीलनुसार लखनौकडून मुंबई संघात गेला आहे. त्यामुळे आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात तीन वेळा ट्रेड होणारा तो पहिलाच खेळाडू आहे.

### तीन यशस्वी संघांकडून खेळणारा सहावा शिलेदार

*मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकाता नाईट रायडर्स हे संघ आयपीएल स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात यशस्वी संघांपैकी एक आहे. यासह शार्दुल ठाकूरच्या नावे आणखी एका खास विक्रमाची नोंद झाली आहे. शार्दुल हा हरभजन सिंग, पियुष चावला, अजिंक्य रहाणे, टीम साऊदी यांच्यानंतर तीन यशस्वी संघांकडून खेळणारा सहावा खेळाडू बनला आहे. शार्दुलला वानखेडे स्टेडियमवर खेळण्याचा चांगलाच अनुभव आहे. आता तो या अनुभवाचा किती फायदा करून घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.*

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे किकबॉक्सिंग स्पर्धेत सुयश





**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने मुंबई विभागीय शालेय किकबॉक्सिंग स्पर्धेत सुयश प्राप्त केले आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी एक सुवर्ण आणि सहा कांस्यपदके पटकाविली.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत मुंबई जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी आणि स्पोर्ट्स किकबॉक्सिंग असोसिएशन मुंबई शहर यांच्या सहयोगाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत हर्शिता संदीप पाटील हिने सुवर्ण, तर समर्थ महेंद्र म्हात्रे, मुबारक मैनुर इस्लाम, रूद्र सुनील पाटील, करण दीपक सुराडकर, नम्रता सुनील सलते, अल्फीया शेहजाद अन्सारी यांनी कांस्यपदक जिंकले. यापैकी हर्शिताची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील, महेंद्र पाटील व महेंद्र घरत यांचे मार्गदर्शन लाभले.

## हर्शिताची राज्यस्तरीय पातळीवर निवड

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, कार्यकारी मंडळ संचालक संजय भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# घरच्या मैदानावर कुलदीप यादवच्या १५० विकेट्स

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना कोलकाता येथील ऐतिहासिक ईडन गार्डन्स स्टेडियमवर खेळला जात आहे. या सामन्यात भारताचा फिरकीपटू कुलदीप यादवने एक पराक्रमाला गवसणी घातली आहे.

कुलदीप यादवने आपल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीत घरच्या मैदानावर १५० विकेट्स घेण्याचा पराक्रम केला. अशी कामगिरी करणारा तो नववा भारतीय ठरला. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये घरच्या मैदानावर १५०हून अधिक विकेट्स घेणारा कुलदीप हा भारताचा तिसरा डावखुरा गोलंदाज ठरला आहे. यापूर्वी रवींद्र जडेजा आणि झहीर खान यांनी हा पराक्रम करून दाखवला आहे. जडेजाने आतापर्यंत घरच्या मैदानावर ३७७ आंतरराष्ट्रीय विकेट्स, तर झहीर यांनी त्यांच्या कारकिर्दीत मायदेशात एकूण १९९ विकेट्स घेतल्या आहेत.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com